# प्रकरण ४
# क्रांती

## औद्योगिक क्रांति :

वस्तूंच्या उत्पादनासाठी यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेल्याने देशाच्या अर्थकारणात ज्या कालात औद्योगिकीकरणाला जोराची चालना मिळते, त्यास देशाच्या इतिहासातील औद्योगिक क्रांतीचा कालखंड म्हणतात. १७५० नंतर शंभर एक वर्षे ग्रेट ब्रिटनमध्ये निरनिराळ्या क्षेत्रांत नवनवीन शोध लागून पारंपरिक कृषिप्रधान समाजाचे मोठ्या झपाट्याने औद्योगिक समाजात रूपांतर झाले. या क्रांतिकारक बदलास फ्रेंच राजकीय अर्थशास्त्रज्ञ जेरोम ॲडॉल्फ ब्लांकी ह्याने 'औद्योगिक क्रांती' हे नाव दिले व नामवंत इतिहासकार टॉयन्बीने ही संज्ञा लोकप्रिय केली. औद्योगिक क्रांती हा एक निश्चित कालखंड नसून ती एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया जगातील निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या काळांत घडून आल्याचे दिसते. औद्योगिक क्रांतीचे लोण चीन, भारत ह्यांसारख्या देशांत पोहोचण्यास विसावे शतक उजाडावे लागले. मात्र या शतकात अमेरिकेची संयुक्त संस्थाने व पश्चिम यूरोपमधील देश दुसऱ्या क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे असलेले दिसतात.

पहिल्या औद्योगिक क्रांतीचा ब्रिटनमधून यूरोपीय देशांत प्रसार झाला किंवा यूरोपातून जगातील इतर देशांत झाला या प्रक्रियेला काही वेळा 'दुसरी औद्योगिक क्रांती' ही संज्ञा वापरली गेली. तर काही वेळा, बाष्पशक्तीची जागा विद्युत्‌शक्तीने घेणे ह्यांसारख्या विकासाच्या नवनव्या अवस्थाही ह्या संज्ञेन दर्शविल्या गेल्या. औद्योगिक क्रांती ह्या संज्ञेचा वापर करण्यात अचूकतेची समस्या उद्‌भवते, कारण अंतर्ज्वलन एंजिन किंवा अणुशक्ती किंवा संगणक ह्यांचा वापर अनुक्रमे तिसरी, चौथी किंवा पाचवी औद्योगिक क्रांती सुचवितो. सर्वसाधारणतः हल्ली औद्योगिक क्रांती ही संज्ञा ग्रेट ब्रिटनमधील यंत्रनिर्मितीच्या सुरुवा तीच्या अवस्थेस लावतात किंवा इतर देशांत जेव्हा हस्तव्यवसाय व त्यांवर आधारित समाजव्यवस्था ही यंत्रोत्पादनाच्या अवस्थेपुढे लुप्त झाली ,त्या अवस्थेला लावतात . याचमुळे भारतात औद्योगिक क्रांती येत आहे, असे बोलले जाते .औद्योगिक क्रांती ही घडत आहे व ती चालूच राहणार आहे .सध्या औद्योगिक क्रांती म्हणून जे काही घडत आहे ते, 'स्वयंचलन', 'संक्रांतिविज्ञान'(सायबरनेटिक्स)अशा विविध संज्ञांनी संबोधिले जात आहे.

## पार्श्वभूमी :

ग्रेट ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती होण्यापूर्वी व्यापारक्रांती झाली होती म्हणजेच व्यापारविस्तार होऊन व्यापाऱ्यांची भरभराट झाली होती. ही भरभराट टिकविण्यासाठी नव्या बाजारपेठांचा शोध घेणे व त्या काबीज करणे हे जेवढे आवश्यक होते, तितकेच विविध वस्तूंचे उत्पादन वाढविणेही आवश्यक होते. म्हणून उत्पादनतंत्र बदलावे लागले व त्यासाठी संशोधन करावे लागले, प्रयोगशीलता दाखवावी लागली. त्याकरिता पैसा खर्चण्यास तयार असणाऱ्या धनिकांचीही या देशात वाण नव्हती. हा धनिक वर्ग प्रामुख्याने भांडवलदार होता. हा व्यापारी भांडवलदारच पुढे उद्योगपती झाला आणि व्यापारी भांडवलशाहीचे रूपांतर औद्योगिक भांडवलशाहीत झाले. प्रथम झालेल्या व्यापारक्रांतीने शोधांना व त्यांचा परिणाम म्हणून झालेल्या औद्योगिक क्रांतीला चालना दिली.

औद्योगिक क्रांतीचे मूळ अनेक शतके आधी शोधता येईल. एखाद्या पिढीत होणाऱ्या प्रगतीस तत्पूर्वीच्या प्रगतीचा आधार असतो, हे उघड आहे. प्रबोधनकालात, म्हणजे साधारणतः १,३०० ते १,५०० या दोनशे वर्षांत घडून आलेल्या शास्त्रीय प्रगतीमुळे औद्योगिक क्रांतिकाळात तांत्रिक शोध लागणे सुकर झाले.

औद्योगिक क्रांतीपूर्वी कृषिक्षेत्रात महत्त्वाचे बदल घडून येत होते. प्रबोधनकालापासून कृषिक्षेत्रातील सरंजामशाहीचा लोप होत होता. शेतीचे हळूहळू पण निश्चितपणे व्यापारीकरण होऊ लागले होते. परंपरागत शेतीव्यवसाय मागे पडून उत्पादनव्यय व फलित यांकडे शेतकरी गंभीरपणे पाहू लागला होता. जमिनीची धूप थांबविण्यासाठी मध्ययुगीन काळात दरवर्षी क्रमाक्रमाने एक-तृतीयांश जमीन नापीक ठेवण्याची पद्धत अवलंबिण्यात येत असे. अठराव्या शतकात या पद्धतीऐवजी जमिनीस नैसर्गिक खतांचा पुरवठा करण्यावर अधिक भर दिला जाऊ

लागला पशुधनाची काळजीपूर्वक निगा राखली जाऊ लागली. ग्रेट ब्रिटनमधील शेतकुंपणाच्या चळवळीमुळे शेतीव्यवसायास एक प्रकारची शिस्त लागली. भूमीचा वापर योजकतेने व उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने करणे सुलभ झाले. औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया सुरू झाल्यावर शेतीचे यांत्रिकीकरण झाले, पशुसंवर्धनास उत्तेजन मिळाले आणि कृषिउत्पादकता एकसारखी वाढीस लागली.

**व्याप्ती:** ग्रेट ब्रिटनमध्ये अठराव्या शतकात जी औद्योगिक क्रांती झाली, तिचे मूळ त्या काळात उत्पादनक्षेत्रात जे विविध शोध लागले त्यांत सापडते. या शोधांचा परिणाम उत्पादनतंत्र पूर्णतया बदलण्यात झाला. साध्या अवजारांच्या साहाय्याने व मुख्यतः मानवी शक्तीचा उपयोग करून घरोघर उत्पादन करणे हे मध्ययुगीन उत्पादनतंत्र होते. त्यात परिवर्तन होऊन उत्पादनाचे यांत्रिकीकरण झाले. औद्योगिकीकरणाचा लाभ प्रथमतः कापडधंद्यास मिळाला. कापडउत्पादनाचे तंत्र प्रगत अवस्थेस पोहोचले होते, परंतु कापडाची वाढती मागणी पुरविणे लँकाशरला शक्य होत नव्हते. या व्यवसायात अधिक लोक गुंतले होते आणि इंग्लंडचे दमट हवामान कापडधंद्यातील यांत्रिकीकरणास अनुकूल होते. या सर्व कारणांमुळे त्या व्यवसायास उपयुक्त अशा शोधांना चालना मिळाली. एकामागोमाग एक शोध लागत गेले. जॉन के ह्या संशोधकाचा उडत्या 'शटल' चा शोध (१७३३) हा पहिला महत्त्वाचा शोध होय. १७६४ मध्ये जेम्स हारग्रीव्हजने 'स्पिनिंग जेनी' हे सूत काढण्याचे यंत्र शोधून काढले. या यंत्राच्या योगाने पूर्वीपेक्षा आठपट सूत निघू लागले. रिचर्ड आर्कराईट याने १७६९ मध्ये तलम सूत काढणाऱ्या 'वॉटर फ्रेम' यंत्राचा शोध लावला. १७७६ साली क्रम्पटनने शोधून काढलेल्या 'म्यूल' नावाच्या यंत्राने पुष्कळ तलम सूत थोडक्या वेळात काढता येऊ लागले. रेव्ह. एडमंड आर्कराईट यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे १७८५ मध्ये यंत्रमागाचा शोध लागला. कापडाचे उत्पादन अनेकपटींनी वाढले, तरी कापसातील सरकी काढण्याचे काम मजूर करीत असल्याने कच्चा कापूस आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध होत नसे. १७९३ मध्ये अमेरिकेत ईली व्हिटनीने ' कॉटन जिन ' चा शोध लावून या अडचणींवर मात केली. या सर्व शोधांच्या परिणामी मोठमोठ्या गिरण्या व कारखाने स्थापन झाले.

अन्य उद्योगांतही त्या काळात शोध लागून यंत्रांचा प्रसार होत होता. बर्मिंगहॅममध्ये धातुवस्तूंच्या निर्मितीचे जे कारखाने होते, त्यांतील कारागिरांनी अनेक शोध लावून त्या त्या वस्तूंचा उत्पादनखर्च कमी करण्यास हातभार लावला होता. लोखंडाच्या धंद्यात याच सुमारास क्रांती घडून आली. लोखंड गाळण्याच्या कामी लाकडी कोळशाऐवजी दगडी कोळशाचा उपयोग करण्यात येऊ लागला. इंग्लंडच्या पश्चिम व उत्तर भागांत लोखंड व पोलादाच्या खाणी सापडल्या. यामुळे लोखंड मुबलक व स्वस्त झाले, यंत्रनिर्मितीस उत्तेजन मिळाले व बर्मिंगहॅम, शेफील्ड आदी नवीन औद्योगिक शहरे भरभराटीस आली. १८१५ मध्ये डेव्ही याने कोळशाच्या खाणीत बिनधोक वापरता येईल असा 'सेफ्टी लँप' हा दिवा शोधून काढला. चिनी मातीच्या भांडी बनविण्याच्या उद्योगात जॉन वेजवूड (१७३० — १७९५) याच्या पुढाकाराने क्रांतिकारक बदल झाले.

औद्योगिक क्रांतीस जोराची चालना मिळण्याच्या कामी बाष्पशक्तीच्या शोधाने मोठाच हातभार लावला. त्यापूर्वी बहुतेक यंत्रे पाणी व वायू यांच्या शक्तीवर चालत होती. वॅटच्या शोधामुळे स्वयंचलित यंत्रांचा वापर कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. मॅथ्यू बोल्टन या बर्मिंगहॅमच्या उद्योगपतीने प्रचंड भांडवल-गुंतवणूक करून बाष्पशक्तीवर चालणारी विविध यंत्रे प्रसारात आणली. बाष्पशक्ती ही औद्योगिक क्रांतीचे प्रतीक ठरली.

उत्पादकांना प्रचंड प्रमाणावर वस्तू उत्पादित करता याव्यात म्हणून कच्चा माल कारखान्याकडे व पक्का माल बाजाराकडे त्वरेने व कमी खर्चाने नेण्यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्थेची गरज होती. ब्रिंडले याने १७६१ मध्ये वर्स्ली ते मँचेस्टरपर्यंत कालवा खणून दाखविला व नंतर इतर पुष्कळ कालवे काढले गेले. मॅक्ॲडम नावाच्या इंजिनियरने गोटे व खडी यांचा उपयोग करून पक्के रस्ते तयार करण्याची नवी पद्धत शोधून काढली व तीप्रमाणे पुष्कळ रस्ते बांधले गेले. पक्के रस्ते व कालवे यांमुळे वाहतुकीत एकदम वाढ झाली. वाफेच्या शक्तीवर चालणारे एंजिन व आगबोट हे या काळातील महत्त्वाचे शोध होत. १८१२ मध्ये स्टीव्हेन्सन याने वाफेच्या शक्तीने चालणारी आगबोट व लोहमार्गावर चालणाऱ्या एंजिनचा शोध लावला १८२५ मध्ये 'द स्टॉक्टन अँड डार्लिंग्टन रेल्वे' सुरू करण्यात आली आणि

खाणीपासून खनिजे वाहून नेण्यासाठी तिचा उपयोग करण्यात येऊ लागला. थोड्या अवधीत लोहमार्गांचे जाळे देशभर पसरले. १८३० मध्ये मँचेस्टर ते लिव्हरपूल हा पहिला रेल्वेरस्ता तयार झाला. १८०७ मध्ये फुल्टनची वाफेवर चालणारी आगबोट हडसन नदीवर ये-जा करू लागली. सारांश, या काळात दळणवळणाची साधने व व्यापार यांत कल्पनातीत क्रांती झाली.

**औद्योगिक क्रांतीचे स्वरूप :**

ग्रेट ब्रिटन : राजकीय एकात्मता व उद्योगक्षेत्रात कमीत कमी हस्तक्षेप करण्याची राज्यकर्त्यांची प्रवृत्ती या गोष्टी औद्योगिक क्रांती ग्रेट ब्रिटनमध्ये प्रथम होण्याच्या दृष्टीने उपकारक ठरल्या. ग्रेट ब्रिटन हा राजकीय दृष्ट्या एकसंध देश होता. तत्कालीन जर्मनीप्रमाणे तो विभागलेला नव्हता किंवा तत्कालीन फ्रान्सप्रमाणे त्याची राज्यसंस्था विस्कळित नव्हती. पंधराव्या शतकाच्या अखेरीस ट्यूडर घराण्याकडे जेव्हा राजसत्ता आली, तेव्हापासून इंग्लंडला शक्तिमान केंद्रीय सत्ता प्राप्त झाली. राजकीय व आर्थिक एकात्मतेचा फायदा ग्रेट ब्रिटनला त्या काळात सर्वांत अधिक मिळाला. व्यापारी वर्गाला ग्रेट ब्रिटनच्या सरंजामशाही अर्थव्यवस्थेत जमीनदाराच्या खालोखाल स्थान होते. औद्योगिक क्रांतिपूर्व काळातही सरकारच्या आर्थिक धोरणावर प्रभाव पाडता येईल, एवढे महत्त्व व्यापारी मध्यम वर्गाला ग्रेट ब्रिटनमध्ये आले होते आणि त्यामुळे व्यापारी वर्गाला जरूर तेवढे आर्थिक स्वातंत्र्य लाभू शकत होते. तेथील संसदेमध्ये त्या काळात जमीनदारवर्गाचा प्रभाव असला, तरी कॉमन्सचे सभासद या नात्याने व बाहेरून पुरेसा प्रभाव पाडण्याइतके बळ तेथील व्यापारी वर्गात होते. व्यापारी वर्गाची वाढती प्रतिष्ठा व प्रभाव हे ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचे महत्त्वाचे कारण होते. जर्मनी, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन या देशांत व्यापाराला कमीअधिक प्रमाणात उत्तेजन दिले जात असूनही, व्यापाऱ्यांना समाजरचनेत गौण स्थान असल्याने व्यापारी हितसंबंधांचा व्हावा तेवढा अनुकूल परिणाम झाला नाही. व्यापारी वर्गाच्या आर्थिक हितसंबंधांचा प्रभाव ग्रेट ब्रिटनच्या अर्थकारणावर पडू लागला आणि व्यापारउद्योगावरील जाचक बंधने शिथिल होऊन औद्योगिक क्रांतीला मोकळेपणाचे वातावरण लाभले.

फ्रान्समध्ये औद्योगिक क्रांती होण्यास अनुकूल परिस्थिती असूनही तिला पोषक असे धोरण तेथील अनियंत्रित राजेशाहीकडून स्वीकारले न गेल्याने तेथील औद्योगिक क्रांतीची गाडी मागे पडली. व्यापारी व उद्योगपती वर्गांचा अर्थकारणावर पडावा तेवढा प्रभाव तेथे न पडल्याने, सरंजामशाही व सरंजामदारवर्ग दीर्घकाळपर्यंत बलवान राहिला. हॉलंडमध्ये व्यापारावर भर असल्याने व्यापारक्रांतीत दीर्घकाळपर्यंत तो देश अग्रभागी होता. तरीही औद्योगिक क्रांती प्रथम तेथे न होता ती ग्रेट ब्रिटनमध्ये झाली. सु. १७३० पर्यंत हॉलंड देश ग्रेट ब्रिटनचा एक मातब्बर प्रतिस्पर्धी होता. त्यानंतर मात्र तो मागे पडला कारण व्यापाराला औद्योगिक उत्पादनाचे पाठबळ देण्याची दक्षता हॉलंडने घेतली नाही तेथील व्यापारी भांडवलशाहीने औद्योगिक भांडवलशाहीचे रूप धारण केले नाही.

सारांश, पुरेशी साधनसंपत्ती, राजकीय एकात्मता, व्यापाराची आधीच झालेली वाढ व त्या वाढीचा फायदा पक्का करण्यासाठी त्याला उत्पादनाची जोड देण्याची व्यापाऱ्यांची दूरदृष्टी, त्या दूरदृष्टीला राज्यकर्त्यांनी दिलेला सक्रिय पाठिंबा या साऱ्या गोष्टींचा मिलाफ झाल्यामुळे ग्रेट ब्रिटन हा देश अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्रांतीसाठी इतर देशांच्या तुलनेने परिपक्क झाला होता. त्यामुळे साहजिकच तेथे औद्योगिक क्रांती प्रथम झाली.

**अन्य देश:**

औद्योगिक क्रांतीमुळे ग्रेट ब्रिटनला वैभव प्राप्त झाले, हे उदाहरण डोळ्यापुढे असताना जगाच्या इतर भागांत ग्रेट ब्रिटनचे अनुकरण करून आपली उन्नती करून घ्यावी, अशी प्रवृत्ती दिसून आल्यास नवल नाही. ग्रेट ब्रिटनच्या अनुभवानंतर औद्योगिकीकरणाची एक अहमहमिकाच जणू देशादेशांत सुरू झाली. ग्रेट ब्रिटनने दाखविलेल्या मार्गाने जे देश पुढे गेले त्यांमध्ये अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, रशिया व जपान यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या सर्व देशांत काही गोष्टींबाबत साधर्म्य दिसून आले, तरी प्रत्येक देशाची खास अशी काही वैशिष्ट्ये होती व ती त्या त्या देशाच्या औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत दिसून आली. परंतु औद्योगिक क्रांतीचा अर्थ स्थूलमानाने औद्योगिक उत्पादनतंत्रात

आमूलाग्र परिवर्तन व त्यामुळे औद्योगिक उत्पादनात होणारी अफाट वाढ असा घेतला, तर औद्योगिक क्रांतीचा स्पर्श आजही जगाच्या लहानशा भागालाच झाला आहे, असे म्हटले पाहिजे. आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या भागांतील बहुसंख्य देश व जनता आर्थिक दृष्ट्या अद्याप मागासलेल्या अवस्थेतच आहे. जगाच्या काही भागांत जी नेत्रदीपक शास्त्रीय व तांत्रिक प्रगती झाली आहे, तिचा अद्यापि जगातील बहुसंख्य लोकांचे राहणीमान वाढण्याच्या दृष्टीने उपयोग झालेला नाही. आर्थिक विकास झाला पाहिजे व त्याला औद्योगिक क्रांतीशिवाय अन्य मार्ग नाही, ही जाणीव मात्र सर्वत्र निर्माण झालेली आहे.

औद्योगिक क्रांती आणि राष्ट्रवाद यांचा घनिष्ठ संबंध आहे, असे दिसून येते. राजकीय व आर्थिक एकात्मता निर्माण होऊन जो देश स्वतंत्र व एकसंध राष्ट्र म्हणून नांदू लागला, त्या देशातच औद्योगिक क्रांती या संज्ञेत अभिप्रेत असलेला आर्थिक विकास होऊ शकला. जर्मनीमध्ये औद्योगिक क्रांतीला चालना १८३३ मध्ये प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे आर्थिक एकीकरण झाल्यानंतरच मिळाली आणि तिला खरी गती १८७० नंतर म्हणजे जर्मन साम्राज्याची प्रस्थापना झाल्यानंतर लाभली. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या औद्योगिक विकासाला सुरुवात अमेरिका ब्रिटिशांच्या कचाट्यातून मुक्त झाल्यानंतरच झाली व अमेरिकेचा जलद विकास मुख्यतः यादवी युद्धानंतर म्हणजे देशाच्या अभंगत्वाला असलेला धोका टळल्यानंतर झाला.

**परिणाम** : औद्योगिक क्रांती होण्यासाठी सर्वत्रच सरंजामशाही आर्थिक व्यवस्थेचा विलय व्हावा लागला. सरंजामदारांचे अथवा मोठ्या जमीनदारांचे अर्थव्यवस्थेवर आणि त्यामुळे आर्थिक धोरणावर वर्चस्व होते. ते वर्चस्व नाहीसे होऊन उद्योगानुकूल अशी आर्थिक नीती स्वीकारली जाईपर्यंत औद्योगिक क्रांती कोठेच होऊ शकली नाही. सरंजामशाहीच्या विलयाची प्रक्रिया औद्योगिक क्रांतीला चालना देणारी ठरली व औद्योगिक क्रांतीमुळे सरंजामशाहीच्या विलयाला गती मिळाली, असे म्हणता येते. औद्योगिक क्रांतीच्या प्रभावाने जमीनदार वर्गाचे अर्थव्यवस्थेवर व राजकारणावर वर्चस्व व्यक्त करणारी सरंजामशाही अर्थव्यवस्था सर्वत्र नष्ट झाली. ही घटना सर्व देशांत सुकरतेने घडली, असे नाही. सरंजामदारांचे वर्चस्व नष्ट होण्यासाठी फ्रान्समध्ये राज्यक्रांती व्हावी लागली. फ्रेंच राज्यक्रांतीचा धक्का जर्मनीलाही बसला. १७९३ नंतर फ्रेंचांनी जर्मनीचा जो भाग व्यापला, त्यात त्यांनी तेथील शेतकऱ्यांना दास्यातून मुक्त केले. १८०६ मध्ये नेपोलियनने प्रशियाचा पराभव केल्यानंतर तेथील राज्यकर्त्यांना आर्थिक, सामाजिक व लष्करी पुनर्घटनेची आवश्यकता पटल्याने त्यांनी शेतकऱ्यांची दास्यातून मुक्तता केली. १८४९ मध्ये विविध देशांत ज्या क्रांत्या झाल्या, त्यांनीच सरंजामशाहीली शेवटचा मोठा धक्का यूरोपमध्ये दिला. रशियात १८६१ मध्ये शेतकऱ्यांना दास्यातून मुक्त करण्यात आले. शेतकऱ्यांचे दास्य ही जमीनदार वर्गाचे वर्चस्व दर्शविणारी महत्त्वाची खूण असली, तरी शेतकरी कायद्याने मुक्त झाला की जमीनदारांचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव नाहीसा होतो, असे मात्र नाही. शेतकऱ्यांचे दास्य नष्ट झाल्यामुळे उद्योगधंद्यांना कामगारवर्ग मिळण्यास मदत होते व उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे कालांतराने औद्योगिक वर्गाचे अर्थव्यवस्थेवरील व पर्यायाने राज्यसंस्थेवरील वर्चस्व वाढून सरंजामशाहीचा ऱ्हास होतो. औद्योगिक क्रांती झालेल्या सर्व देशांत ही प्रक्रिया घडून आली आहे. सरकारची आर्थिक नीती जमीनदारांच्या हितसंबंधांना पोषक असावी की उद्योगधुरीणांना अनुकूल असावी, हाच अमेरिकेच्या यादवी युद्धामागील खरा प्रश्न होता. त्या यादवी युद्धाचा कौल उद्योगक्षेत्राच्या बाजूने पडला. जपानमध्ये १८६७ नंतरच्या क्रांतीनंतर तेथील राज्यकर्त्यांची आर्थिक नीती औद्योगिक क्रांतीला अनुकूल अशी झाली. औद्योगिक क्रांतीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, कोणत्याही देशात औद्योगिक क्रांतीचे परिणाम उद्योगक्षेत्रापुरते मर्यादित राहिले नाहीत ते सर्वस्पर्शी आणि दूरगामी ठरले. असे होणे अपरिहार्यच होते. कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर कामगारांनी एकत्र येऊन अजस्र यंत्रांच्या साहाय्याने केलेले उत्पादन हे स्वरूप औद्योगिक क्रांतीने धारण केले. औद्योगिक क्रांतीसाठी मोठ्या संख्येने कामगारवर्ग एकत्र येणे आवश्यक होते. त्यासाठी शेतीतून मोठ्या संख्येने मनुष्यबळ मोकळे व्हावयास हवे होते. शेतीची क्रांतिकारक पुनर्घटना त्यासाठी आवश्यक होती. जेव्हा ही पुनर्घटना झाली, तेव्हा औद्योगिक क्रांती शक्य झाली. आणखीही एका कारणाकरिता शेतीची पुनर्घटना औद्योगिक क्रांतीसाठी आवश्यक होती. कच्चा माल व कामगारांसाठी अन्न शेतीतून उपलब्ध होते. हा माल मोठ्या प्रमाणावर हाती येणे आवश्यक होते. शेतीची पुनर्घटना झाल्याने ते शक्य झाले. तसेच काहीसे वाहतूक-

दळणवळण या बाबतीतही घडले. औद्योगिक क्रांती यशस्वी होण्यासाठी कच्च्या-पक्क्या मालाची वाहतूक शक्य तेवढी स्वस्त व जलद आणि मोठ्या प्रमाणावर होणे अगत्याचे होते. तेव्हा औद्योगिक क्रांतीच्या बरोबरीने शेती, वाहतूक आदी अन्य आर्थिक क्षेत्रांची पुनर्घटना होणे क्रमप्राप्तच होते. उद्योगधंद्यांना अल्पकालीन व दीर्घकालीन भांडवलपुरवठा सातत्याने व मोठ्या प्रमाणावर होणे अत्यावश्यक झाले. त्यामुळे त्या त्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण बदल झाले. म्हणूनच औद्योगिक क्रांती झालेल्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप ज्या देशात ती झाली नाही, तेथील अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळे आहे.

औद्योगिक क्रांतीच्या परिणामी मनुष्याला उत्पादन वाढविणे, शीघ्रगतीने प्रवास करणे आणि एकमेकांशी संपर्क ठेवणे सहजसाध्य झाले. देशाची राष्ट्रीय संपत्ती वाढली, सुबत्ता आली आणि मनुष्याच्या वाट्याला अधिक सुखसोयी आल्या. परंतु प्रारंभीच्या काळात क्रांतीमुळे मनुष्यप्राण्याचे दारिद्र्य आणि दैन्यावस्था अधिकच वाढीस लागल्याचे दिसते. खेड्यात राहणारा, घरात उत्पादन करणारा, घराभोवती थोडीफार शेती पिकविणारा श्रमिक क्रांतीनंतर शहराकडे ओढला गेला. सामाजिक दृष्टीने 'नागरीकरण' हा औद्योगिक क्रांतीचा एक अतिशय महत्त्वाचा परिणाम ठरला. औद्योगिक क्रांतीनंतर कामगारवर्ग मोठ्या संख्येने शहरांत स्थायिक झाला व शहरी लोकसंख्येचे प्रमाण वेगाने वाढत गेले. त्यामुळे शहरे व त्यांतील जीवन हा नवीन प्रश्न समाजापुढे उभा राहिला. कामगारांच्या प्रश्नाने वेगळे व तीव्र स्वरूप धारण केले. हे दोन्ही प्रश्न आपापल्या पद्धतीने सोडविण्यात औद्योगिक राष्ट्रे औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात गुंतलेली दिसतात. मनुष्य यंत्रावर अवलंबून राहू लागला. श्रमविभागणी व श्रमाचे विशेषीकरण यांमुळे श्रमिकाला तेच ते काम एकसारखे करावे लागत असे. साहजिकच श्रमिकाचे व्यक्तिमत्व लोप पावले, त्याला यंत्राची कळा आली. यंत्र हे केवळ उत्पादनाचे साधन व राहता माणसाला गुलाम बनविण्याइतके सामर्थ्य यंत्रात निर्माण झाले.

ह्याचे सामाजिक परिणाम कमी भयावह नव्हते. तुटपुंज्या वेतनासाठी कारखान्यात अनेक तास श्रम करणे आणि गलिच्छ वस्तीत जीवन कंठणे श्रमिकांच्या नशिबी आले. प्रारंभीच्या काळात कामगारांना रोज तेरा तास काम करावे लागे. खेड्यातून शहराकडे लोकांचा ओघ चालूच राहिला. स्त्रिया व लहान मुले कारखान्यात दिवस-रात्र खपू लागली आणि वाढती बेकारी ही एक नवीन समस्या निर्माण झाली. नोकरीच्या शोधात वणवण भटकणाऱ्या हजारो लोकांव्यतिरिक्त मंदी, तात्पुरती टाळेबंदी किंवा कारखान्याची दिवाळखोरी यांमुळे कित्येक लोकांना बेकार व्हावे लागे. नवनव्या यंत्रांचा शोध लागल्यानंतर त्याचा अपरिहार्य परिपाक म्हणजे अनेक नोकरांना कामावरून काढून टाकावे लागे. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीस कामगारांनी आपल्यावर बेकारीची पाळी आणणाऱ्या यंत्रांचा विध्वंस केल्याची उदाहरणे आहेत. १७७९ मध्ये लँकाशरला दंगे झाले आणि अनेक कापडगिरण्यांचा नाश करण्यात आला.

कारखान्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारला 'कारखाना अधिनियम' करावा लागला. १८०३ मध्ये प्रथमतः कारखाना अधिनियम लागू झाला. १८४४ मध्ये कारखान्यात लहान मुलांना काम करण्यास बंदी व कामाचे तास यांबाबत कायदा करण्यात आला. यानंतर अनेक प्रकारचे कायदे करून कामगारांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागले.

औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदार व कामगार असे दोन नवीन वर्ग निर्माण झाले. मालक-मजूर तंटे मिटविण्यासाठी मजूरविषयक कायदे करण्यात आले. मजुरांच्या संघटना स्थापन झाल्या. कामगारवर्ग व कामगार चळवळ ही देशादेशांच्या राजकारणात एक प्रभावी शक्ती उदयास आली. साम्यवाद, समाजवाद, नियंत्रित भांडवलशाही, वर्गसमन्वय इ. राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानांचा उदय झाला. कारखानदारांना मालाचा उठाव करून अधिक नफा मिळविण्याकरिता परदेशातील बाजारपेठा काबीज करण्याची लालसा निर्माण झाली. इंग्लंडसारख्यादेशाने खुल्या व्यापाराचे तत्त्व स्वीकारले. व्यापाराला स्थैर्य आणण्याकरिता सत्ता संपादन करण्याची देशांना इच्छा होऊ लागली. औद्योगिक क्रांतीमुळे आंतरराष्ट्रीय संघर्षाचे स्वरूपसुद्धा बदलले. औद्योगिक क्रांतीसाठी ज्या देशांत स्पर्धा होऊ लागली, त्यांच्यात कच्च्या मालाची उगमस्थाने व बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी संघर्ष उद्‌भवला. त्यातूनच साम्राज्यवाद व साम्राज्यवादी युद्धे यांची बीजे रोवली गेली. साम्राज्यवादी देशांचे गुलाम बनलेल्या राष्ट्रांत स्वातंत्र्याची जी चळवळ सुरू झाली, त्यामागेदेखील स्वातंत्र होऊन उद्योगप्रधान राष्ट्र बनावे ही प्रेरणा महत्त्वाची होती. राष्ट्राच्या

अंतर्गत अर्थकारणाच्या बाबतीत पहावयाचे झाल्यास, निर्हस्तक्षेपाचे धोरण मागे पडून गुंतागुंतीच्या उद्योगप्रधान समाजाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी सरकारला सामाजिक व आर्थिक बाबतींत हस्तक्षेप करणे अपरिहार्य झाले.

औद्योगिक क्रांतीचे परिणाम समाजाच्या धार्मिक जीवनावरही झाले. औद्योगिक क्रांती ही सामान्यतः यंत्राच्या वाढत्या उपयोगांवर अधिष्ठित होती. यंत्र हे साहजिकच मानवाने निसर्गावर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक ठरले आहे. या विजयाचे प्रमाण जसजसे वाढत गेले, तसतशी धार्मिक समजुती, अंधश्रद्धा यांची मानवी जीवनातून पाछेहाट होत गेली. धर्माचे महत्त्व कमी होऊ लागले व भौतिक उन्नतीवर मानवाच्या आशाआकांक्षा केंद्रित होऊ लागल्या.

ग्रेट ब्रिटनमधील अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील औद्योगिक क्रांती व तिचे परिणाम म्हणजेच, स्थूलमानाने गेल्या दोनशे वर्षांतील जागतिक इतिहास होय. औद्योगिक क्रांतीचे जे बहुविध परिणाम झाले ते सर्वच इष्ट होते, असे म्हणता यावयाचे नाही. त्यांतील काहींची इष्टानिष्टता निर्णायक स्वरूपात अद्यापि ठरावयाची आहे. औद्योगिक क्रांतीमुळे विज्ञान व उद्योग यांची हातात हात घालून वाटचाल सुरू झाल्याने भौतिक प्रगतीची घोडदौड सुरू झाली. भौतिक समृद्धी हे जर मानवी जीवनाचे उद्दिष्ट असेल, तर ते प्राप्त करून घेण्याची संधी औद्योगिक क्रांतीने मानवाला उपलब्ध करून दिली, असे म्हटले पाहिजे. आजही भौतिक समृद्धी फारच थोड्या देशांच्या व त्यांतील मूठभर लोकांच्याच वाट्याला आली आहे. ती सर्वांना मिळवून देण्याचे कर्तृत्व मानवाला अद्यापही करावयाचे आहे. त्या दृष्टीने औद्योगिक क्रांती अद्यापि पूर्ण झालेली नाही, असे म्हणता येईल.

**औद्योगीक क्रांतीचा समाजावर पडलेला प्रभाव**

औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेले सामाजिक प्रारूप. औद्योगिक क्रांतीत्त्योर समाज हा मानवी समाजाच्या उत्क्रांतीतील औद्योगिकरणानंतरचा टप्पा मानला जातो. ही अवस्था ज्या देशांनी प्रथम औद्योगिक क्रांतीचा अनुभव घेतला अशा देशांमध्ये अनुभवयास येते. अमेरिका, पश्चिम यूरोप आणि जपानमध्ये औद्योगिक क्रांतीत्त्योर समाज पहावयास मिळतो.

१८ व्या शतकात यूरोपात विशेषत: इंग्लडमध्ये उत्पादनपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाला.शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेऐवजी यंत्रांवर आधारित उद्योगधंदे निर्माण झाले.यंत्राच्या सहाय्याने उत्पादन करण्याची औद्योगिक क्रांती उदयास आली. औद्योगिक क्रांती अनुभवलेल्या देशांमध्ये २० व्या शतकात जी आर्थिक स्थित्यंतरे झाली त्यातून औद्योगिक क्रांतीत्त्योर समाज निर्माण झाला.औद्योगिक क्रांती झालेल्या देशांमधील अर्थव्यवस्थेमध्ये मुख्य हिस्सा हा उत्पादन क्षेत्राचा होता;परंतु औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजामधील अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा हा उत्पादन क्षेत्रापेक्षा अधिक असतो.

औद्योगिक क्रांतीउत्तोर समाज ही संकल्पना प्रथम अमेरिकन समाजशास्त्रज्ञ डेनिअल बेल याने वापरली. बेल याने १९७३ साली The Coming of Post-Industrial Society: A Venture in Social Forecasting या ग्रंथामध्ये ही संकल्पना मांडली. बेल याने औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजाचे लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत : अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादनाऐवजी सेवांच्या निर्मितीवर भर दिला जातो. देशातील फार थोडे उद्योगधंदे प्रत्यक्ष उत्पादन निर्मितीमध्ये असतात. वस्तूंचे उत्पादन करण्यापेक्षा नवीन सेवांची निर्मिती करुन नफा मिळविला जातो. अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या कंपन्यांपेक्षा सेवा क्षेत्रामध्ये अग्रेसर असणाऱ्या कंपन्यांचे आर्थिक सामर्थ्य आणि राजकीय प्रभाव वाढतो. सध्या अमेरिकेत गुगल, फेसबुक, बर्कशायर, हॅथवे आदि सेवा क्षेत्रातील कंपन्या या आकाराने उत्पादनक्षेत्रातील कंपन्यांपेक्षा मोठ्या आहेत.

जागतिकीकरण आणि स्वयंचलित यंत्रांच्या उदयामुळे कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे संघटित कामगारांचे, अंगमेहनतीचे काम करणाऱ्या कामगार वर्गाचे महत्त्व कमी झाले. या कामगार वर्गाऐवजी समाजामध्ये संगणक अभियंता, डॉक्टर, बँकर्स, वैज्ञानिक अशा पांढरपेशा व्यावसायिकांचा नवा वर्ग उदयास आला. औद्योगिक

कामगार वर्गाची जागा पांढरपेशा कामगार वर्ग घेत आहे. कारण उत्पादन दुसरीकडे (दुसऱ्या देशांमध्ये) हलविले जात आहे. समाजामध्ये शाळा, दवाखाने, संशोधन संस्था आदि संस्था ज्यांच्याकडे नफा मिळविण्याच्या हेतूने पाहिले गेले नव्हते, त्यांमध्ये बाजारपेठ आणि नफा मिळविण्याचा प्रयत्न खाजगी संस्थांकडून केला जातो.

औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजामध्ये ज्ञानाला भांडवलाचा दर्जा प्राप्त होतो. सैद्ध्यांतिक ज्ञानाऐवजी व्यावहारिक ज्ञानाला प्राधान्य दिले जाते. नवीन ज्ञाननिर्मितीतून संपत्ती निर्माण होण्याच्या शक्यता निर्माण होतात. ज्ञाननिर्मितीतून या समाजामध्ये भांडवल निर्मिती होते. नवीन कल्पना किंवा शोध हे अर्थव्यवस्थेला कलाटणी देतात. उद्योगनिर्मितीची पारंपरिक गणितं या समाजात मोडीत निघतात.नव्या कल्पना असणारा व्यक्ती अल्पावधीत यशाच्या शिखरावर पोहचतो. उदा. फेसबुकच्या माध्यमातून मार्क झुकेरबर्ग या विशीतील युवकाने कोणत्याही औद्योगिक घराण्याच्या पार्श्वभूमीशिवाय उद्योजक होण्याचे स्वप्न साकार केले. Amazon, Pay Pal, Pay Tm, Uber, Facebook आदि कंपन्यांनी केवळ कल्पक विचारांच्या साहाय्याने आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या क्रांतीचा फायदा घेत उद्योगधंदे उभारले. या उद्योगांच्या निर्मितीचे गमक हे भांडवल नसून कल्पनाशक्ती हे आहे. Amazon किंवा Uber या कंपन्यांनी कोणत्याही स्वरुपाची निर्मिती न करता ग्राहक आणि उत्पादक यांना जोडणारे व्यासपीठ निर्माण (माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने) करुन उद्योग उभारले. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादकाचे महत्त्व कमी होऊन वरील कंपन्यांसारखे व्यासपीठ पुरविणाऱ्या कंपन्यांचे महत्त्व वाढले आहे. या समाजामध्ये भांडवल असलेलाच व्यक्ती उद्योजक होईल असे नाही, तर ज्याच्याकडे नवीन कल्पना आहेत अशा व्यक्तीलाही मोठा उद्योजक होण्याची संधी निर्माण झालेली आहे.

माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, सायबरनेटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, वर्तनवादी अर्थशास्त्र यांसारख्या नवीन विद्याशाखेचा उदय या समाजामध्ये होतो. या विद्याशाखांच्या माध्यमातून प्रगतीच्या नवीन शक्यतांचा शोध घेतला जातो. नव्याने उदयास येणाऱ्या तंत्रज्ञानाचा समाजावर होणारा परिणाम तपासला जातो. शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यापीठे आणि तंत्रविद्यानिकेतन संस्थांवर अधिक भर दिला जातो. या संस्थांच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजाला आवश्यक अशा प्रमाणात तंत्रज्ञ पुरविले जातात. वर्तनवादी अलगोरिथम आणि तत्सम तंत्राच्या सहाय्याने व्यक्तीवर्तनाचा अभ्यास होतो. या अभ्यासाच्या मदतीने व्यक्तींचे राजकीय वर्तन प्रभावित करण्याचा किंवा तपासण्याचा प्रयत्न केला जातो. लोकांच्या अभिवृत्तीनुसार त्यांना वस्तू आणि सेवांचा पुरवठा करण्यासाठी त्यांचा इंटरनेटवरील आणि सोशल मिडीयावरील वापराचा आधार घेतला जातो. औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजात पारंपरिक विद्याशाखेचे महत्त्व कमी होऊन त्याऐवजी नवीन उदयास आलेल्या माहिती तंत्रज्ञानाशी निगडीत शाखांना महत्त्व प्राप्त होते.

औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजात केवळ अर्थव्यवस्थेतच बदल होत नाहीत, तर या बदलांचा परिणाम सामाजिक व्यवहारांवर देखील होतो. उत्पादन प्रक्रियेच्या आउटसोर्सिंग(बाह्यस्त्रोत) मुळे मूळ देशातील लोकांचा दृष्टीकोन परकियांबाबत किंवा निर्वासितांबाबत बदलतो. समाजातील जे घटक पूर्वी उत्पादन प्रक्रियेशी जोडलेले होते त्यांना नवीन अर्थव्यवस्थेत योग्य ती सामाजिक भूमिका मिळत नाही.

समाज या संकल्पनेशी औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजाचा प्रत्यक्ष परिणाम झालेला दिसतो. समाज ही भौगोलिक सलगतेतून निर्माण होणारी गोष्ट न राहता ती विविध ठिकाणी विखुरलेल्या परंतु समान विचारांच्या व्यक्तींमधील भावनिक जवळीकतेने बनते. इंटरनेट आणि दूरसंचार क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे दूर अंतरावर राहणाऱ्या व्यक्तींमध्ये संवाद साधणे शक्य होते.कामाच्या ठिकाणी असणाऱ्या किंवा सहकामगारांपेक्षा वेगळे विश्व निर्माण होण्यास संसूचन साधनांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे शक्य होते. त्यामुळे औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजात सोशल नेटवर्कींग वेबसाईटच्या माध्यमातून लोक एकत्रित येताना दिसतात. मानवी संबंधांमध्ये देखील तंत्रज्ञानाने शिरकाव केलेला आहे. औद्योगिक क्रांतीत्त्योर समाजामध्ये ज्ञान ही सत्ता आहे तर तंत्रज्ञान हे साधन आहे.उत्पादन प्रक्रिया आणि सेवा यांमधील संबंध बदलतात.या समाजातील सेवा,तंत्रज्ञान आणि माहिती यांना उत्पादनापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. या समाजामध्ये सेवा क्षेत्राचे महत्त्व हे प्राथमिक आणि दुय्यम क्षेत्रापेक्षा अधिक वाढलेले असते

**रक्तहीन राज्यक्रांति (Bloodless Revolution) (Glorious Revolution)**

इंग्लंडमध्ये इ. स. १६८८ साली मानवी रक्ताचा एक थेंबही न सांडता झालेली राज्यक्रांती. या क्रांतीचा उल्लेख वैभवशाली राज्यक्रांती असाही केला जातो.

स्ट्यूअर्ट घराण्यातील दुसरा चार्ल्स या राजाच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ दुसरा जेम्स (कार. १६८५—८८) हा इंग्लंडच्या गादीवर आला. ईश्वरदत्त व अनियंत्रित राजसत्तेच्या तत्त्वांवर त्याचा विश्वास होता. त्याचा ओढा कॅथलिक पंथाकडे असल्यामुळे इंग्लंडमध्ये रोमन कॅथलिक संप्रदायाची स्थापना व्हावी, म्हणून तो प्रथमपासून प्रयत्नशील होता. त्याने चर्च, विश्वविद्यालये व इतर महत्त्वाची खाती यांवरील प्रमुख जागी कॅथलिक व्यक्तींना नेमले आणि त्याकरिता पार्लमेंटची संमती न घेता त्याची सभा पुढे ढकलली. १४ व्या लूईच्या सल्ल्याने त्याने इंग्लंडमध्ये कॅथलिक पंथाचा प्रसार करण्यासाठी ४ एप्रिल १६८७ रोजी 'डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स' हे फर्मान काढले आणि पार्लमेंटने केलेले सर्व धार्मिक कायदे रद्द केले. असेच दुसरे फर्मान ३ मे १६८८ रोजी त्याने प्रसिद्ध केले. हे फर्मान वाचण्याची आपल्यावर सक्ती होऊ नये, अशी विनंती करणाऱ्या सात प्रमुख बिशपांवर खटले भरले. कॅथलिकांना टेस्ट व कॉर्पोरेशन ॲक्टमधून मोकळीक देण्याचा हुकूम काढला. त्याच्या दोन्ही मुली — मेरी आणि ॲन — प्रॉटेस्टंट असल्याने कदाचित जेम्सच्या मृत्यूनंतर हे धोरण बदलेल, अशी लोकांना आशा होती; परंतु १० जून १६८८ रोजी जेम्सला मुलगा झाला. हा जेम्स एडवर्ड कॅथलिक वातावरणात व मेरी ऑफ मॉडेना या कॅथलिकपंथी राणीच्या पोटी जन्मल्यामुळे तोसुद्धा कॅथलिकच असणार, या भीतीने लोकांनी जेम्सचा जावई (मेरीचा पती), हॉलंडचा राजा, विल्यम ऑफ ऑरेंज याला पाचारण केले. हा विल्यम म्हणजे इंग्लंडच्या पहिला चार्ल्स या राजाचा नातू (मुलीचा मुलगा) होता. ५ नोव्हेंबर १६८८ रोजी तो आपल्या १५,००० सैन्यासह इंग्लंडमध्ये टॉर्बे बंदरापाशी दाखल झाला. विल्यमबरोबर लढाई करण्यास जेम्सकडे सुसज्ज सैन्य होते, पण त्याची मुलगी ॲन व इतर सहकारी तसेच जॉन चर्चिल (भावी ड्यूक ऑफ मार्लबरो) याच्यासह काही सेनापती जेम्सच्या विरोधात गेल्यामुळे त्याला देशत्यागाशिवाय अन्य पर्याय राहिला नाही. तो इंग्लंड सोडून फ्रान्सला पळून गेला (डिसेंबर १६८८). जाताना त्याने राजाधिकारदर्शक शिक्कासुद्धा टेम्स नदीत भिरकावून दिला.

या आणीबाणीच्या प्रसंगी चौदाव्या लूईने जेम्सला मदत केली नाही किंवा जेम्सनेही फ्रान्सची मदत मागितली नाही. कदाचित त्याला आपल्या कर्तृत्वाविषयी फाजील आत्मविश्वास असावा किंवा आपल्या राज्यात लूईसारख्या बलाढ्य राजास हस्तक्षेप करून देणे त्याला रुचले नसावे, असे काही इतिहासकारांचे मत आहे. जेम्सच्या राज्यत्यागानंतर कोणताही संघर्ष न होता सत्तांतर झाले आणि ही राज्यक्रांती घडून आली. म्हणून तिला रक्तहीन क्रांती हे यथार्थ नाव प्राप्त झाले आहे.

या क्रांतीचे दूरगामी परिणाम झाले. विल्यमची पत्नी मेरी ही ज्येष्ठ मुलगी असल्याने तीच खरी वारस होती; पण विल्यमने केवळ राणीचा पती या नात्याने राहण्याचे नाकारले आणि राजा म्हणूनच आपण इथे आलो आहोत, अन्यथा स्वदेशात परत जाऊ असे स्पष्ट सांगितले, तेव्हा कन्व्हेंशन पार्लमेंटने काही अटींवर विल्यम आणि मेरी या दोघांस संयुक्तपणे राजपद दिले; तथापि इंग्लंडमधील पक्षोपपक्षांत या मुद्द्यावर एकमत नव्हते. जेम्सचे अनुयायी आणि काही लहान संघ सोडले तर देशात टोरी आणि व्हिग हे प्रमुख पक्ष होते. टोरी पक्षातही तीन भिन्न विचारांचे गट होते. पहिल्या गटाला जेम्सबरोबर समझोता करून त्यास परत बोलवावे आणि त्यालाच स्थानापन्न करावे, असे वाटत होते. दुसऱ्या गटाचे मत असे होते की, राजाला वेडा ठरवून राजमुखत्याराने (रीजन्सीने) राज्यकारभार चालवावा. राजाने राज्यत्याग केला आहे ही वस्तुस्थिती गृहीत धरून मेरीला वारसाहक्काने गादी द्यावी, असे तिसऱ्या गटाचे मत होते. मात्र जेम्स पळून गेल्यामुळे रिक्त सिंहासनावर नवीन व्यक्ती बसविण्याचा अधिकार लोकांचा आहे, हे तत्त्व व्हिग पक्षाने मांडले. यानंतर लोकांनी आपल्या हक्कांचा मसुदा तयार केला. तो राजदंपतीकडून १२ मार्च १६८९ रोजी जाहीर करण्यात आला. त्याच्या आधारावर लोकांच्या हक्कांचे विधेयक (बिल ऑफ राइट्स) १६८९ मध्ये संमत करण्यात आले. इंग्लंडच्या संविधानात्मक इतिहासात या विधेयकाचे स्थान मॅग्ना कार्टाच्या बरोबरीचे मानण्यात येते.

या क्रांतीने इंग्लंडमध्ये घटनात्मक शासन अस्तित्वात आले. वरील विधेयकात पार्लमेंटचे वर्चस्व हे महत्त्वाचे सूत्र होते. याशिवाय इंग्लंडचा राजा किंवा राणी प्रॉटेस्टंट पंथीय असले पाहिजेत आणि त्यांनी पार्लमेंटच्या संमतीखेरीज कायदे रद्द किंवा कायम करू नयेत, असे बंधन घालण्यात आले. लोकांना भाषणस्वातंत्र्याची हमी देण्यात आली आणि त्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे अभिवचनही मिळाले. राजाने प्रसंगोपात्त पार्लमेंटचा सल्ला घ्यावा, पार्लमेंटच्या संमतिविना कर बसवू नयेत, दंड करू नये व खडी फौजही ठेवू नये असे नमूद करण्यात आले. या विधेयकाने लोकांना आपले प्रतिनिधी पार्लमेंटमध्ये पाठविण्याचा अधिकार दिला आणि लोकशाहीची निकोप वाढ व्हावी म्हणून वारंवार पार्लमेंटची सभा घेण्याचे राजाला आवाहनही केले.

यांतील अनेक तत्त्वे यापूर्वीच्या मॅग्ना कार्टात ग्रथीत होती, पण कालौघात त्यांची विस्मृती झाली होती. त्यामुळे या कायद्यात ती पुन्हा संग्रहीत करण्यात आली. हे विधेयक पक्षोपपक्षांचे मतभेद बाजूला ठेवून देशहितासाठी सर्वानुमते संमत करण्यात आले. हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य होय. थोडक्यात, या क्रांतीने पार्लमेंटचे वर्चस्व प्रस्थापित करून राज्यघटनेचा मूलभूत पाया निश्चित केला आणि इंग्लंडची राजसत्ता ही लोकसत्तेवर आधारित आहे, हे पुन्हा स्पष्ट केले. राजा आणि पार्लमेंट यांच्यात सु. ६० वर्षे चाललेल्या दीर्घ कलहाचा निकाल या क्रांतीमुळे लागला आणि लोकमताविरुद्ध जाणाऱ्या राजास बाजूला सारण्याचे हक्क लोकांना — पार्लमेंटला — आहेत, हे पुन्हा सिद्ध झाले. त्यामुळे इंग्लंडमध्ये घटनात्मक नियंत्रित राजेशाही अस्तित्वात आली. इंग्लंडची रक्तहीन राज्यक्रांती १८ व्या शतकातील अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीलाही प्रेरणादायी ठरली.

**अमेरिकन क्रांती**

उत्तर अमेरिकेतील तेरा ब्रिटिश वसाहतींनी मायदेशाविरुद्‌घ १७७५ पासून १७८३ पर्यंत केलेले यशस्वी बंड. त्याला ‘स्वातंत्र्ययुद्ध’ किंवा ‘अमेरिकन क्रांती’ म्हणतात.

सतरावे शतक व अठराव्या शतकाचा प्रथम चरण अशा दीर्घ कालावधीत अमेरिकेत अनेक यूरोपीय देशांच्या वसाहती स्थापन झाल्या. त्यांत इंग्लंडच्या तेरा वसाहती होत्या. या तेरा वसाहतींत स्थानिक वन्य जमाती, निग्रो गुलाम, इंग्रज, आयरिश, जर्मन, डच, स्पॅनिश, पोर्तुगीज आदी यूरोपीय असा संकीर्ण समाज नांदू लागला. यांत बहुसंख्य इंग्रज होते आणि त्यांच्या भाषेला सर्वमान्यता लाभली होती. बहुतेक वसाहतींचा कारभार ब्रिटिश शासनाने नियुक्त केलेला गव्हर्नर स्थानिक प्रातिनिधिक संस्थांच्या सल्ल्याने चालवीत असे.

तथापि फ्रेंच वसाहतींचा घेरा सभोवताली असल्याने ब्रिटिश वसाहतवाल्यांत सतत असुरक्षितपणाची भावना असे. स्वसंरक्षणासाठी मायदेशाच्या सैन्याची आवश्यकता असल्याने, मायदेशाने घातलेली अनेक राजकीय व आर्थिक बंधने त्यांना निमूटपणे मान्य करावी लागत. वसाहती म्हणजे स्वस्त व मुबलक कच्चा माल पुरविणारे, तसेच हव्या त्या चढ्या दराने पक्का माल घेणारे देश, असे इंग्लंडचे सर्वसाधारण धोरण असे. वसाहतींचा वाहतूक-व्यापार इंग्लंडच्याच बोटींतून (वसाहतींना स्वतंत्र बोटी नसल्याने) चालला पाहिजे, वसाहतींनी कच्चा माल इंग्लंडलाच विकला पाहिजे, इंग्लंडचाच पक्का माल विकत घेतला पाहिजे, स्वतः पक्का माल तयार करता कामा नये, कोणत्याही देशांतून माल आयात केल्यास तो प्रथम इंग्लंडमध्ये उतरवून मग वसाहतींत जावा इ. नौकानयन-कायद्यांतील निर्बंधांमुळे इंग्रज व्यापाऱ्यांचा अमाप फायदा, तर वसाहतवाल्यांची कुचंबणा होई. ह्यामुळे वसाहतींचा औद्योगिक विकास अर्थातच अशक्य झाला होता.

वसाहतींतील इंग्रज इंग्लंडमधील इंग्रजांपेक्षा कनिष्ठ आहेत, असा सार्वत्रिक समज होता. याचे वसाहतवाल्यांना साहजिकच वैषम्य वाटे पण मायदेशाकडून मिळणाऱ्या संरक्षणाच्या मोबदल्यात सर्व निर्बंध व विषमता मान्य करणेच त्यांना भाग होते. तरीसुद्धा कागदोपत्री असलेल्या निर्बंधांची वसाहतवाले फारशी फिकीर करीत नसत. पण चोरट्या प्रकारांना पायबंद घालून, उत्पन्नातील गळती थांबविण्यासाठी ⇨सप्तवार्षिक युद्धाच्या (१७५६—६३) अखेरीस मायदेशींच्या शास्त्यांनी नियमांची कडक अंमलबजावणी सुरू केली. चोरट्या व्यापारातील नफा घटताच

वसाहतवाल्यांनी मायदेशाच्या शोषक नियमांविरुद्ध आंदोलन सुरू केले. साहजिकच सप्तवार्षिक युद्धाच्या भरतवाक्यानंतर लवकरच स्वातंत्र्ययुद्धाची नांदी म्हटली गेली.

पॅरिस-तहाने (१७८३) वसाहतीच्या पश्चिमेकडील विस्तीर्ण मुलूख इंग्लंडला मिळाला. याचा पद्धतशीर विकास व्हावा म्हणून यात वसाहती करण्याबद्दल अनेक नियम करण्यात आले. तेव्हा 'अमेरिकेत स्थायिक झालेल्या वसाहतवाल्यांना मज्जाव करून आपल्या मर्जीतल्या लोकांना ह्या जमिनी दिल्या जातील व पुढे हे उपरे त्या भरघोस किंमतीला विकतील', या संशयाने वसाहतवाल्यांतील मायदेशाविषयीचा अविश्वास बळावला. वसाहतींच्या रक्षणाचा बंदोबस्त करण्यासाठी व सप्तवार्षिक युद्धाचा खर्च भरून काढण्यासाठी ग्रेनव्हिल मंत्रिमंडळाने १७६५ मध्ये स्टँप ॲक्ट संमत करून कायदेशीर व्यवहारातले दस्तऐवज, वृत्तपत्रे वगैरेंना तिकिटे लावलीच पाहिजेत, असा नियम केला. प्रतिनिधींनी हा कायदा संमत केला नसल्यामुळे वसाहतवाल्यांनी त्याला संघटितपणे विरोध केला. या कायद्याने जारी झालेल्या तिकिटांचा नाश करणे, तिकिटविक्रेत्यांना त्यागपत्र द्यावयास लावणे इ. प्रकार सुरू होऊन खुद्द गव्हर्नरांना स्वतःच्या सुरक्षितपणाबद्दल धास्ती वाटण्याइतके उग्र आंदोलन वसाहतींत सुरू झाले. परिणामतः स्टँप ॲक्ट रद्द करण्यात आला, पण वसाहतींत कर लागू करण्याचा पार्लमेंटचा अधिकार वादातीत असल्याचे तत्व कायद्याच्या रूपाने जाहीर करण्यात आले त्यामुळे वादाचे कारण काही नष्ट झाले नाही. पुढे १७६७ मध्ये चहा, काच, कागद, रंग इत्यादींवर कर बसविण्यात आले. तेव्हा या वस्तूंवरील बहिष्काराची चळवळ बॉस्टनहून चौफेर पसरली. चहाव्यतिरिक्त इतर वस्तूंवरील कर रद्द झाले, तरी चळवळ मंदावली नाही. उलट वसाहतवाले जास्तच चिडले व १७७३ च्या डिसेंबरात बॉस्टन बंदरात नांगरून पडलेल्या जहाजांतील चहाची खोकी समुद्रात फेकण्याचा प्रसिद्ध प्रकार झाला. बॉस्टनमधील बंडाळी मोडून काढण्यासाठी ब्रिटिश संसदेने १७७४ च्या मेमध्ये कायदा करून बॉस्टन उजाड करण्याचे ठरविले. याच्या निषेधार्थ वसाहतींतील कित्येक शहरांनी एक दिवस उपोषण करून सामुदायिक प्रार्थना केल्या.

वसाहतींतल्या गव्हर्नरांचे पगार तेथल्या बिथरलेल्या लोकप्रतिनिधींच्या लहरीवर अवलंबून राहू नयेत, म्हणून हे पगार परभारे ब्रिटिश तिजोरीतून देण्याचा पायंडा संसदेने पाडला. जनरल गेज या लष्करी अधिकाऱ्याची मॅसॅचूसेट्सचा गव्हर्नर म्हणून नेमणूक केली व ब्रिटनमधून येणाऱ्या लष्करी जवानांची सोय वसाहतींतील कुटुंबवत्सल लोकांनी केली पाहिजे, अशी सक्ती करण्यात आली. या प्रकारांनी वसाहतींतला क्षोभ आणखी भडकला. १७७४ च्या सप्टेंबरात बारा वसाहतींतले पुढारी एकत्र जमले व त्यांनी 'कॉंटिनेंटल कॉंग्रेस'ची स्थापना केली. सगळ्या वसाहतींचे संघराज्य बनवावे, मायदेशाशी नाममात्र निष्ठेने गुंतलेले हे संघराज्य व्यवहारात स्वतंत्र असावे, असा विचार गॅलोवे या पुढाऱ्याने कॉंग्रेससमोर मांडला. पण हा नेमस्त विचार बहुसंख्य सभासदांना पटला नाही. ब्रिटनबरोबरचे सारे व्यवहार बंद पाडण्याचे ठरवून, तसेच घरभेद्यांच्या बंदोबस्तासाठी जालीम उपाय मुक्रर करून, पुढील मे महिन्यात कॉंग्रेसची बैठक घेण्याचा निर्धार करून हे अधिवेशन समाप्त झाले. यापुढे युद्ध अटळ आहे, या जाणिवेने दोन्ही पक्ष वागू लागले.

मॅसॅचूसेट्सची गुर्मी जिरविण्याच्या निर्धाराने ब्रिटिश सरकारची पावले पडू लागली. वसाहतवाल्यांनी शस्त्रास्त्रांचे साठे करण्याला व सैन्यभरतीला सुरुवात केली. कंकॉर्ड गावी वसाहतवाल्यांनी जमविलेला शस्त्रसाठा हस्तगत करण्यासाठी जनरल टॉमस गेजने बॉस्टनहून सातशे सैनिकांची पलटण रवाना केली, पण वसाहतवाल्यांनी या पलटणीला पिटाळून लावले. जूनच्या मध्यास बंकरहिलच्या लढ्यातही ब्रिटिश सैनिकांची कत्तल करण्यात आली. टिंकडरोगा हे मोक्याचे ठिकाणही बंडखोरांनी सर केले. याच सुमारास कॉंटिनेंटल कॉंग्रेसने ⇨जॉर्ज वॉशिंग्टनची सरसेनापती म्हणून नियुक्ती केली व अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले.

अनेक शतकांचा इंग्लंडला अनुभव असूनही हे युद्ध जड गेले. आपल्याच बांधवांविरुद्ध लढण्याची जिद्द सैन्यात विशेष नव्हती. वसाहतवाल्यांच्या अडचणी तर पर्वतप्राय होत्या. पैसा उभारणे, सैनिक गोळा करणे, साहित्य जमविणे इ. गोष्टींसाठी कॉंटिनेंटल कॉंग्रेसला स्वतःला पूर्ण स्वतंत्र समजणाऱ्या वसाहतींवर अवलंबून राहावे लागे. वसाहतींच्या स्वातंत्र्याविरुद्ध लढणारेही पुष्कळच नागरिक होते. काही ध्येयनिष्ठ पुढाऱ्यांचे नेतृत्व, आपला लढा न्यायाचा असल्याची

सामान्यांची समजूत, जॉर्ज वॉशिंग्टनसारखा चारित्र्यवान, समतोल बुद्धीचा, चिकाटीचा सरसेनापती व परदेशांची मदत हे वसाहतवाल्यांचे प्रमुख भांडवल होते.

टिंकडरोगानंतर अमेरिकन सैन्याने माँट्रिऑल काबीज करून क्वेबेकला वेढा घातला. परंतु क्वेबेक सर झाले नाही. त्यानंतर अमेरिकन सेनेने डॉर्चेस्टर हाइट्स, प्रिन्स्टन, ट्रेंटन इ. ठिकाणी विजय मिळविले, तर बँडीवाइन, जर्मनटाउन, फिलाडेल्फिया वगैरे महत्वाचे भाग सोडले. सर्व बाजूंनी निराशेची परिस्थिती निर्माण झाली असता वॉशिंग्टनला दैवाने हात दिला. इंग्रज सेनानी बर्‌गाॅइन न्यूयॉर्क संस्थानाच्या उत्तर भागात धुमाकूळ घालून अमेरिकनांच्या युद्धक्षेत्रात मधोमध पाचर ठोकून त्यांना धुळीस मिळविण्याचे मनसुबे रचत होता. पण गेट्स या अमेरिकन सेनापतीने त्याच्यावरच डाव उलटविल्याने सॅराटोगा येथे बर्‌गॉइनला ऑक्टोबर १७७७ मध्ये संपूर्ण शरणागती पतकरावी लागली. गेट्सच्या या विजयाने युद्धाचे स्वरूप पालटले. फ्रान्स-स्पेनसारखी राष्ट्रे अमेरिकेच्या बाजूने युद्धात सामील झाली व स्वातंत्र्ययुद्धाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा लाभून अमेरिकेच्या स्वातंत्र्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. तेव्हा अमेरिकेची संस्थाने स्वतंत्र व स्वायत्त आहेत, असा रिचर्ड हेन्री लीचा ठराव काँग्रेसने संमत केला व ४ जुलै १७७६ रोजी ⇨अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा सर्वत्र फडकला.

सॅराटोगाच्या विजयानंतर फ्रान्सने अमेरिकेशी तह करून ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारले. फेब्रुवारी १७७८ मध्ये स्पेननेही फ्रान्सचे अनुकरण केले. सैन्याची रसद रणक्षेत्रापर्यंत निर्वेधपणे पोहोचणे त्यांच्या आरमारामुळे ब्रिटिशांना मुष्किल झाले. सु. सहा हजार फ्रेंच सैनिक व लाफायेतसारखे अधिकारी वॉशिंग्टनच्या मदतीस आल्याने अमेरिकेची बाजू बळकट झाली. दक्षिणेकडील वसाहतींतून विजय सुलभतेने मिळेल असे वाटून सॅराटोगानंतर क्लिंटन-कॉर्नवॉलिससारखे ब्रिटिश सेनानी दक्षिणेकडे वळले. पण स्वातंत्र्यवादी लोकांच्या कडव्या प्रतिकारामुळे त्यांचे काम बिकट होऊन बसले. शेवटी दक्षिण सोडून कॉर्नवॉलिस न्यूयॉर्ककडे वळला, पण वॉशिंग्टनने त्याला यॉर्कटाउनमध्ये कोंडून धरले व द ग्रासच्या हाताखाली फ्रेंच नाविक दलाने कॉर्नवॉलिसचा जलमार्ग अडविला व तो पुरता कैचीत सापडला. अखेर १९ ऑक्टोबर १७८१ रोजी कॉर्नवॉलिसने शरणागती पतकरली. तथापि दोन वर्षे युद्ध रेंगाळले. पुढे १७८३ मध्ये पॅरिसच्या तहाने स्वातंत्र्ययुद्धाची समाप्ती झाली. तहाच्या वाटाघाटीत ⇨बेंजामिन फ्रँक्लिन व जॉन ॲडम्स यांनी अमेरिकन राष्ट्राचे प्रतिनिधित्व केले

सबंध कॅनडा अमेरिकेला मिळावा ही अमेरिकनांची मागणी मान्य झाली नाही. पण १७७४ मध्ये कॅनडात सामील केलेल्या मुलुखावरील सत्ता इंग्लंडने सोडली. पश्चिमेकडे मिसिसिपी नदी, उत्तरेकडील सुपीरिअर वगैरे सरोवरांच्या परिसरातील प्रांत अशा सरहद्दी ठरून ओहायओच्या खोऱ्यासकट सगळा मुलूख अमेरिकेकडे गेला. फ्लॉरिडा स्पेनला मिळाला. अमेरिकन नागरिकांच्या इंग्लंडमधल्या सावकारांचे युद्धपूर्व-काळातले कर्ज फेडण्याची व युद्धकाळात राजनिष्ठ अमेरिकनांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करण्याची हमी अमेरिकेने घेतली. निर्भेळ लोकशाही, समानता वगैरे तत्त्वांची चर्चा यूरोपातले राज्यशास्त्रधुरंधर वारंवार करीत या तत्त्वांचा आधार घेऊन व इंग्लंडचा युद्धात पाडाव करून अमेरिका राष्ट्र अस्तित्वात आल्याबरोबर या तत्त्वांना एक वेगळीच प्रतिष्ठा लाभली. अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठी व लोकशाहीसाठी लढणाऱ्या फ्रेंच सैनिकांना आपल्या देशातील सरंजामी व अनिर्बंध राजेशाही मान्य होणे शक्य नव्हते. साहजिकच अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने फ्रेंच राज्यक्रांती अपरिहार्य होऊन तेथील पुराणी राजसत्ता व सरंजामी समाजरचना संपुष्टात आली. एकोणिसाव्या शतकात यूरोपातील अनेक देशांत राजसत्तेचे उच्चाटन झाले ते काही अंशी अमेरिकेतील लोकशाहीच्या यशामुळेच, असे म्हणता येईल. अमेरिकेच्या यशामुळे इंग्लंडला आपल्या वसाहतविषयक धोरणात आमूलाग्र बदल करावा लागून, ब्रिटिश राष्ट्रकुलाचा पाया घातला गेला व जागतिक राजकारणात नवे विचारप्रवाह सुरू झाले.

**अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा (United States Declaration of Independence)**

उत्तर अमेरिका खंडातील ब्रिटिश वसाहतींनी मायदेशाविरुद्ध युद्ध पुकारल्यानंतर आपले ध्येय व उद्दिष्ट जगाला समजावे आणि स्वतंत्र राष्ट्रांचे आपल्याला साहाय्य मिळावे, म्हणून वसाहतींच्या प्रतिनिधिसभेने ४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. तेव्हापासून ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला जातो.

वसाहती व मायदेश यांच्यातील वाद विकोपाला जाऊन युद्ध सुरू झाल्यावरही वसाहतींनी ब्रिटनचे सार्वभौमत्व मान्य करावे, पण अंतर्गत व्यवहारात वसाहतींना स्वातंत्र्य असावे, अशी तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न झाले; तथापि उभय पक्षांतील जहालांच्या विरोधामुळे ते फसले. युद्ध सुरू होताच वसाहतींनी फ्रान्ससारख्या देशांची मदत मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. तेव्हा लढून यश मिळविल्यानंतरही वसाहती ब्रिटनची ताबेदारी स्वीकारणार असतील, तर फ्रान्स आदी देशांनी त्यांच्या भानगडीत का पडावे, असा प्रश्न त्या देशांतील मुत्सद्दी व राज्यकर्ते उपस्थित करू लागले. त्यांच्या समाधानकारक उत्तरासाठी निर्भेळ स्वातंत्र्याचा पुरस्कार आवश्यक होता.

व्हर्जिनिया वसाहतीचा प्रतिनिधी रिचर्ड हेन्री ली याने कॉंटिनेंटल काँग्रेसमध्ये मांडलेला निर्भेळ स्वातंत्र्याचा ठराव २ जुलै १७७६ रोजी मान्य झाला. या ठरावावर चर्चा चालू असताच स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करण्यासाठी टॉमस जेफर्सन, बेंजामिन फ्रँक्लिन, जॉन ॲडम्स, रॉजर शेर्मन व रॉबर्ट लिव्हिंगस्टन या सभासदांची नियुक्ती झाली; परंतु जाहीरनाम्याची भाषा व भावना ह्या दोहोंचाही जेफरसन हाच मुख्य शिल्पकार होता. त्यात काही दुरुस्त्या करून काँग्रेसने तो सर्वानुमते स्वीकारला.

ह्या जाहीरनाम्यात ब्रिटनने व विशेषतः तिसऱ्या जॉर्जने वसाहतींवर केलेल्या अन्यायांची यादी दिली आहे. वसाहतींची स्वातंत्र्याची मागणी निसर्गसिद्ध असल्याच्या तात्त्विक प्रतिपादनास त्यात प्राधान्य दिले आहे. जन्मतः व निसर्गतः सर्व माणसे सारखी असतात, हा सिद्धांत यात ठासून मांडला आहे. काही ईश्वरदत्त अधिकारांपासून माणूस वंचित राहू शकत नाही, या सूत्राच्या स्पष्टीकरणार्थ या जाहीरनाम्यात जीवितविषयक अधिकारांची परिगणना केली असून तिला सुखाकांक्षेच्या पूर्तीची पुस्ती जोडली आहे. सरकार ही संस्था मनुष्यनिर्मित असल्याने उन्मार्गगामी सरकार बदलून नवे सरकार अस्तित्वात आणण्याचा मानवाचा अधिकार वादातीत आहे, असा या अधिकाराचा गौरव या जाहीरनाम्याने केला आहे.

या जाहीरनाम्यावर लॉक, रूसो प्रभृती यूरोपीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारसरणीचा व टॉमस पेनचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. याच्या स्वीकृतीमुळे ब्रिटनशी तडजोड अशक्य झाली, वसाहतींना अन्य देशांची मदत मिळणे सुलभ झाले व अमेरिकेचे स्वातंत्र्य दृष्टिपथात आले.

अमेरिका स्वतंत्र होऊन आता दोनशे वर्षे झाली. या काळात निरनिराळ्या देशांतील अन्यायी राजवटींविरुद्ध झालेल्या संघर्षात मानवी गटांच्या प्रयत्नांना तात्त्विक बैठक मिळाली ती या जाहीरनाम्यातील विचारांची; हे अमेरिकेतील निग्रोंच्या हक्कांची चळवळ, अनेक देशांचे पारतंत्र्यातून विमोचन व अनेक देशांतील साम्राज्यशाहीविरुद्धचे संघर्ष इत्यादींवरून दिसते. फ्रेंच क्रांतिकारकांनी स्वीकृत केलेली मानवी हक्कांची सूची व निरनिराळ्या देशांच्या संविधानांत ग्रथित झालेले नागरिकांचे मूलभूत हक्क याच जाहीरनाम्यावर आधारलेले आहेत. त्यामुळे 'मानवी इतिहासाला कलाटणी देणारी आधुनिक काळातील क्रांतिकारक घोषणा' असा या जाहीरनाम्याचा गौरव होतो, तो यथार्थच वाटतो.

**दासमुक्ती चळवळ**

(स्लेव्हरी). दास्य अथवा गुलामगिरी, वेठबिगारी आणि भूदासपद्धती ह्या तिन्ही सामाजिक प्रथा अशा आहेत, की ज्यांत मालक आणि गुलाम, वेठबिगारी वा कूळ यांचे परस्परसंबंध कोणत्याही कायदेशीर करारावर अवलंबून नसतात तर ते एकतर्फी मालकांच्या इच्छेवर ठरविले जातात. गुलाम, बिगारी किंवा कूळ यांना मालकाविरुद्ध स्वतःचे

हक्क नसतात. बहुधा प्रस्थापित कायद्यानेच त्यांचे हक्क काढून घेतलेले असतात. पण या तिघांपैकी गुलाम हा मालकाच्या संपूर्ण ताब्यात असतो. परिणामाच्या दृष्टीने गुलाम व बिगारी यांत फारसा फरक आढळत नाही पण त्यांच्या स्थितीची कारणे मात्र वेगळी असतात. गुलामगिरी ही संस्था सामाजिक—आर्थिक व्यवस्थेशी निगडीत असते, तसेच समाजातील प्रचलित नीतिमत्तेशी व प्रतिष्ठेच्या कल्पनेशीही निगडित असते. शिकारीवर जगणाऱ्या आदिम जमातींत युद्धात हरलेल्या व कैद केलेल्या शत्रूस ठार मारीत असत व त्याच्या बायकामुलांना पकडून त्यांच्याकडून कामे करून घेत. भटक्या मेंढपाळाच्या जमातीत ही गुलामगिरी फारशी आढळून येत नाही. परंतु जेव्हा समाज शेतीप्रधान बनला आणि समाजातील पूर्वीची युद्धखोरी टिकून राहिली किंवा त्यावर युद्धांचे प्रसंग वारंवार आले तेव्हा शेतमजुरांच्या वाढत्या गरजा भागविण्याकरिता गुलामांची आवश्यकता भासली आणि युद्धात पकडलेल्या अगर हरलेल्या लोकांचा याकरिता वापर होऊ लागला. त्यामुळे त्यांच्या मालकांना भरपूर सवड मिळून ते ऐदी बनले आणि गुलामांना त्यांची सर्व कामे करावी लागली. जवळजवळ सर्वच कृषिप्रधान आदिवासी जमातींमध्ये गुलामगिरी केव्हानाकेव्हा रूढ झाल्याचे दिसते. गुलामांना कधी सौम्यतेने तर कधी कठोरपणाने वागविण्यात आल्याचे आढळून येते. धर्माधिष्ठित किंवा धर्मप्रधान समाजांत सापेक्षतः सौम्यपणा दिसून येतो. पण क्षात्रवृत्तीचा आणि धनिकांचा प्रभाव असेल, तर तेथे गुलामांना अधिक क्रूरपणे वागविले जाते. राजकीय दृष्ट्या गुलामगिरी कितीही अपरिहार्य असली—अर्थात हा मुद्दा विवाद्य आहे—तरी तिचा नैतिक परिणाम मात्र गुलाम आणि त्यांचे मालक या दोघांच्याही अधःपतनात झाला, याबद्दल दुमत नाही. आदिवासी जमातींप्रमाणे प्रमुख प्राचीन संस्कृतींमध्येही गुलामगिरी रुढ असल्याचे दिसून येते. प्राचीन ग्रीसमध्ये गुलामाच्या पोटी जन्मलेले, मातापित्यांकडून लहानपणी विकले गेलेले, युद्धात पकडलेले, चाचेगिरीला बळी पडलेले किंवा व्यापाऱ्यांच्या कचाट्यात सापडलेले असे नाना तऱ्हेचे गुलाम असत. रोमन संस्कृतीत सामान्य जनांच्या हातात अधिकाधिक जमीन आली पण नागरिकांना युद्धानिमित्त सतत राज्याबाहेर जावे लागत असल्यामुळे शेतात राबण्याकरिता गुलामांची गरज होती. शेवटी गुलामांची संख्या इतकी वाढली, की त्यातूनच गुलामांचा व्यापार सुरू झाला. गुन्हेगारांना शिक्षा म्हणूनही गुलामगिरी पतकरावी लागत असे. तसेच कर्जदारास कर्जाची परतफेड म्हणून सावकाराकडे गुलाम म्हणून राहणे भाग पडत असे किंवा कर्जाची भरपाई म्हणून सावकार त्याला गुलाम म्हणून विकत असे. पंधराव्या शतकात पोर्तुगिजांनी आफ्रिकेत निग्रो लोकांना पकडून त्यांना यूरोपमध्ये गुलाम म्हणून विकले आणि नव्या वसाहतवादी गुलामगिरीस सुरुवात झाली. पुढील दोनशे वर्षांत आफ्रिका आणि अमेरिका यांच्यामध्ये गुलामांचा व्यापार पद्धतशीर चालू होता. सतराव्या शतकात इंग्लंडनेही हा व्यापार सुरू केला. लाखो निग्रो लोकांना पकडून विकण्यात आले. यांत आफ्रिकेतील निग्रो पुढाऱ्यांचाही हात होता.

गुलामगिरीच्या प्रथेविरुद्ध धार्मिक व नैतिक कारणांमुळे प्रथम अठराव्या शतकात लोकमत जागृत होऊ लागले. विशेषतः त्या शतकाच्या उत्तरार्धात ह्या चळवळीस फार महत्त्व प्राप्त झाले. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध व फ्रेंच राज्यक्रांतीमुळे आणि त्यांतून निर्माण झालेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ह्या तत्त्वांमुळे गुलामगिरी नष्ट करण्याच्या चळवळीस जोराची चालना मिळाली. ह्या चळवळीची दोन प्रमुख अंगे होती. देशातील अंतर्गत गुलामगिरी नष्ट करणे, हे एक व आंतरराष्ट्रीय पातळीवर विस्तृत प्रमाणावर चाललेल्या गुलामांच्या व्यापाराला प्रतिबंध करणे, हे दुसरे अंग होय.

गुलामगिरीची परंपरा नष्ट करण्याच्या बाबतीत अग्रपूजेचा मान ब्रिटनलाच देणे योग्य होय. ही प्रथा नष्ट झालीच पाहिजे, असे प्रतिपादन करण्यात 'क्वेकर' पंथीय लोक आघाडीवर होते. १७७२ सालीच ग्रॅन्‌व्हिल शार्प नावाच्या पुढाऱ्याने गुलामगिरी बेकायदेशीर असल्याचा निकाल ब्रिटिश न्यायालयात मिळविला होता. परंतु प्रत्यक्ष गुलामगिरी नष्ट होण्यास ब्रिटनमध्येही बराच कालावधी जावा लागला. ब्रिटनमधील गुलामगिरीविरुद्धच्या चळवळीने नेतृत्व विल्यम विल्बरफोर्स याच्याकडे होते व त्याने संसदेत व बाहेर प्रचंड चळवळ करून जनमत अनुकूल करून घेतले. गुलामांची परिस्थिती सुधारून त्यांच्यात स्वतंत्र होण्याची पात्रता निर्माण केली पाहिजे, हे तत्त्व ब्रिटिश संसदेने मान्य केल्यावर १८२७ साली प्रथम गुलामांना स्वतःचे स्वातंत्र्य विकत घेण्याचा अधिकार देण्यात आला. अशा रीतीने मुक्त झालेल्यांना १८२८ मध्ये संपूर्ण राजकीय हक्कही देण्यात आले. १८३३ मध्ये मात्र संसदेने कायदा करून सर्व गुलामांची मुक्तता

केली व त्यांच्या मालकांना—विशेषतः वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका व मॉरिशस येथील—योग्य ती नुकसानभरपाई देण्यात आली. अशा रीतीने ब्रिटिश साम्राज्यातच सु. ८ लक्ष गुलामांची मुक्तता करण्यात आली.

भारतामध्ये ब्रिटिश सरकारने १८४३ च्या पाचव्या कायद्यानुसार गुलामगिरीचे समूळ उच्चाटन केले. ह्या कायद्याप्रमाणे कोठल्याही प्रकारची नुकसानभरपाई न देता गुलामांची मुक्तता करण्यात आली.

अमेरिकेतही गुलामगिरीविरुद्ध जनमत तयार होत चालले होते. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धानंतर गुलामगिरीविरुद्ध सुरू असलेल्या चळवळीस जोराची चालना मिळाली तथापि जॉर्जिया अगर दक्षिण कॅरोलायना संस्थानांच्या विरोधामुळे तेथे गुलामगरीप्रतिबंधक कायदा होऊ शकला नाही. ह्याबाबतीत उत्तर व दक्षिणेकडील संस्थानांच्या मतभेदाची परिणती अध्यक्ष अब्राहम लिंकन ह्यांच्या कारकीर्दीतील यादवी युद्धांत झाली. १ जानेवारी १८६३ रोजी गुलामांच्या मुक्ततेची घोषणा करून लिंकनने सु. ४० लक्ष निग्रो गुलामांची मुक्तता केली. १८६५ मध्ये अमेरिकेत गुलामगिरी संपूर्णपणे नष्ट झाली.

दक्षिण अमेरिकेत व यूरोपातील इतर राष्ट्रांतही ब्रिटन व अमेरिकेचे उदाहरण गिरविण्यात आले. द. अमेरिकेतील प्रत्येक राष्ट्राने स्वातंत्र्याची घोषणा करताच गुलामगिरीही नष्ट केली. सगळ्यात शेवटी ब्राझीलने १८८८ मध्ये ही प्रथा बंद केली. ब्रिटनने आपल्या साम्राज्यातून गुलामगिरी नष्ट केल्यावर यूरोपात स्वीडनने १८४७ मध्ये, हॉलंडने १८६३ मध्ये व फ्रान्सने आपल्या संपूर्ण साम्राज्यात १८८८ मध्ये ही प्रथा बंद केली. स्पेनने १८७३ मध्ये पोर्टोरिकोत व १८८० मध्ये क्यूबामध्ये गुलामगिरी मोडली आणि जर्मनीने १९०१ मध्ये आपल्या आफ्रिकी वसाहतींतून गुलामगिरीस बंदी घातली. अशा रीतीने विसाव्या शतकाच्या सुरुवातीस सुधारलेल्या बहुतेक सर्व देशांतून गुलामगिरीची प्रथा कायद्याने नष्ट केल्याचे दिसून येते.

गुलामगिरीची प्रथा संपूर्णपणे बंद होण्यासाठी गुलामांचा आंतरराष्ट्रीय व्यापार बंद होणे आवश्यक होते परंतु हा व्यापार अत्यंत किफायतशीर असल्याने तो सोडून देण्यास कोणताही देश तयार नव्हता. तथापि ह्याही क्षेत्रात ब्रिटनने पुढाकार घेतला. ब्रिटिश जहाजांची मोठी संख्या आणि ब्रिटिश आरमाराचे समुद्रावरील प्रभुत्व ह्या दोन गोष्टींमुळे अर्ध्याहून अधिक व्यापार ब्रिटनच्या हाती होता. परंतु ब्रिटनमध्येच गुलामगिरीविरुद्ध मोहीम सुरू झाल्याने गुलामांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण घालणे ब्रिटनला भाग पडले. अमेरिकेतील ब्रिटनच्या वसाहतींनी स्वातंत्र्य पुकारल्यानंतर हा आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झालाच पाहिजे, असा ब्रिटिश जनतेचा निर्धार झाला. हा प्रश्न पक्षीय न मानता राष्ट्रीय मानण्यात आला. १८०७ मध्ये विल्बरफोर्सच्या प्रयत्नामुळे ब्रिटिश संसदेने प्रजाजनांना व ब्रिटिश जहाजांना ह्या व्यापारात भाग घेण्यास बंदी केली. १८११ साली झालेल्या कायद्यान्वये अशा गुन्ह्यांना कडक शासन ठरविण्यात आले व तेव्हापासून ब्रिटिशांनी ह्या व्यापारातून अंग काढून घेतले.

तथापि त्यामुळे गुलामांचा व्यापार बंद पडला नाही. उलट इतर देशांच्या व्यापाराला फायदाच झाला. ह्या व्यापाराचा संपूर्ण बीमोड करण्यासाठी ब्रिटनला पुढे सु. पन्नास वर्षे झगडावे लागले व त्यात अमेरिकेचे मोलाचे साहाय्य मिळाले. ह्या कालखंडात समुद्रावर पहारा ठेवून निरनिराळ्या यूरोपीय राष्ट्रांवर दडपण आणून आवश्यक तेव्हा आंतरराष्ट्रीय तह अगर अन्य करार घडवून आणून अथवा शेवटी आपल्या आरमारी शक्तीचा उपयोग करून ब्रिटनला व अमेरिकेला हा गुलामांचा व्यापार बंद पाडावा लागला. नेपोलियनच्या पराभवानंतर भरलेल्या व्हिएन्ना काँग्रेसनंतर स्वीडन, हॉलंड, फ्रान्स, स्पेन व पोर्तुगाल ह्या राष्ट्रांनी आपल्या नागरिकांस गुलामांचा व्यापार करण्यास मनाई केली. दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांनी स्वातंत्र्य मिळवताच अशी बंदी जारी केली होती. अशा रीतीने सर्व बाजूंनी ह्या व्यापारावर बंदी घालूनसुद्धा अनेक वर्षे गुलामांचा चोरटा व्यापार अटलांटिक महासागरात चालू होता व अनेक वेळा ब्रिटिश आरमारास तो आपल्या सामर्थ्याच्या जोरावर नष्ट करावा लागत असे.

अटलांटिक महासागरांतून होणारा व्यापार जरी बंद झाला, तरी आफ्रिका व आशिया खंडांतील हा व्यापार बंद होण्यास बराच कालावधी लागला. त्यात अरबांचा व्यापार फार मोठा होता. आफ्रिकेतून गुलामांची विक्री तुर्कस्तान,

इराण, अरबस्तान इ. देशांत फार मोठ्या प्रमाणावर होत असे व ह्या व्यापाराचे मुख्य केंद्र झांझिबार येथे होते. ब्रिटनने भारत व आपल्या ताब्यातील इतर प्रदेशांतून ह्या व्यापाऱ्यास बंदी केली व तांबड्या समुद्रातून होणाऱ्या व्यापारास आळा घालण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवला. शेवटी १८७३ मध्ये झांझिबारने आपल्या बंदरातून चालणाऱ्या ह्या व्यापारास संपूर्ण बंदी घातल्यावरच आफ्रिका व आशिया येथील गुलामांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारास बऱ्याच अंशी प्रतिबंध झाला.

गुलामगिरीची प्रथा मोडण्यात व गुलामांचा व्यापार नष्ट करण्यात ब्रिटनने नेतृत्व केले असले, तरी त्यासाठी ब्रिटनला आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रयत्न करावे लागले. १८०७ साली ब्रिटनने गुलामगिरी बंद केल्यावर, १८१४ मध्ये फ्रान्सबरोबर झालेल्या पॅरिसच्या करारात या बाबतीत ब्रिटनने फ्रेंच सहकार्याचे अभिवचन मिळविले व पुढे १८१५ मध्ये भरलेल्या व्हिएन्ना काँग्रेसमध्ये गुलामगिरीचा व्यापार नष्ट करण्याच्या तत्त्वास इतर राष्ट्रांची संमती मिळाली. परंतु एवढे करूनच ही पाशवी प्रथा बंद होणे शक्य नव्हते. समुद्रावरील चाचेगिरी करणाऱ्याविरुद्ध जे उपाय योजण्यात येत असत, तशाच प्रकारचे मार्ग अवलंबिणे इष्ट होते व त्यासाठी काही आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे करार करणे आवश्यक होते. ह्या करारांमुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याची हमी मिळाली, तसेच जहाजांची तपासणी करण्याची व्यवस्थाही होऊ शकली. अशा प्रकारच्या काही तहांची माहिती पुढे दिली आहे :

पहिला महत्त्वाचा तह म्हणजे १८४१ सालचा लंडनचा तह. हा तह ब्रिटन, ऑस्ट्रिया, फ्रान्स, प्रशिया व रशिया ह्यांच्यात घडून आला व त्यान्वये गुलामांचा आंतरराष्ट्रीय व्यापार नष्ट करावा, असे ठरले. पुढे १८५५ मध्ये बर्लिनमध्ये जी आफ्रिकाविषयक यूरोपीय राष्ट्रांची परिषद झाली, तीत जे प्रस्ताव करण्यात आले त्यांतील कलम ९ गुलामगिरीच्या व्यापारासंबंधी होते. १८९० मध्ये ब्रूसेल्स येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली, तीत ह्या व्यापाऱ्यास आळा घालण्यासाठी एक संघटना तयार करून झांझिबार येथे त्याचे कार्यालयही स्थापण्याचे ठरले. पुढे पहिले महायुद्ध संपल्यानंतर अमेरिका, बेल्जियम, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान व पोर्तुगाल ह्या राष्ट्रांनी गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्याचा व गुलामांच्या व्यापारावर संपूर्ण बंदी घालण्याचा प्रयत्न करण्यासंबंधी करार केला व त्यास जर्मनी, ऑस्ट्रिया, बल्गेरिया आणि हंगेरी यांचीही युद्धानंतरचा तह होण्यापूर्वीच संमती मिळवली.

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाने ह्या विषयाचा संपूर्ण अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. तिच्याच शिफारशींवर आधारित असा आंतरराष्ट्रीय तहाचा मसुदा १९२६ मध्ये सभासद राष्ट्रांच्या सह्यांसाठी ठेवला. १९५३ पर्यंत ह्या करारास ब्रिटन, राष्ट्रकुलांतील राष्ट्रे, अमेरिका, फ्रान्स इ. ५३ राष्ट्रांनी संपूर्ण अनुमती घोषित केली होती. ह्या करारान्वये ह्या राष्ट्रांनी गुलामांच्या व्यापारास बंदी घातली पाहिजे एवढेच नव्हे, तर सर्व प्रकारची गुलामगिरीच समूळ नष्ट केली पाहिजे, असा आपला निर्धार व्यक्त केला. राष्ट्रसंघाने सुरू केलेले कार्य दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रे ह्या संस्थेने पुढे चालू ठेवले. १९४८ साली संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने जी मूलभूत मानवी हक्कांची घोषणा केली तीत गुलामांचा व्यापार व प्रत्यक्ष गुलामगिरीची प्रथा नष्ट झालीच पाहिजे, असा उल्लेख आहे. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळाने काही देशांतून राजकीय दडपणासाठी सक्तीने घेण्यात येणाऱ्या वेठीचा निषेध केला होता. त्याचा रोख रशियातील अशा प्रकारावर होता. संयुक्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली १९५६ मध्ये गुलामगिरीविरुद्ध परिषद घेण्यात आली. ह्या परिषदेने एक करारनामा तयार करून जगातील राष्ट्रांनी त्यास औपचारिक मान्यता द्यावी, असे आवाहन केले.

संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक मंडळाने १९५० मध्ये एक समिती नेमली. तिचा अभिप्राय असा आहे, की आंतरराष्ट्रीय तह अगर कायदा करून गुलामगिरी नष्ट होणे शक्य नाही. ज्या कारणांनी गुलामगिरी निर्माण होते, ती आर्थिक अगर सामाजिक कारणे दूर झाली नाहीत तर गुलामगिरी नष्ट होणे शक्य नाही.

## फ्रेंच राज्यक्रांती

१८ शतकाच्या उत्तरार्धातच या नवीन कल्पनांची, सुधारणांची, मूल्यांची बीजे दृष्टोत्पत्तीस येत होती. याच वेळी जुन्या मूल्यांचे थडगे बांधले होते. परंतु त्याचबरोबर नवीन युगाची तुतारी फुंकली गेली. १९ व्या शतकाचा उदय हा अत्यंत क्रांतिकारक समजला जातो. कारण औद्योगिक क्रांती व फ्रेंच राज्यक्रांती या दोन क्रांतिकारी घटनांमुळे सारा युरोप खंड तळापासून ढवळून निघाला. त्यामुळे युरोपचा चेहरामोहरा बदलून टाकला होता. जमीनदारी, सरंजामदारी, हुकूमशाही इ. बाबी नष्ट करुन आधुनिक जगात लोकशाही  पाया घातला. मानवी मूलभूत हक्कांची म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचे एक नवीन युग अस्तित्वात आले. युरोपमधील इतर राष्ट्रांतील पीडित व दडपल्या गेलेल्या लोकांससुद्धा आपल्या राष्ट्रात बदल घडवून आणण्यास स्फूर्ती प्राप्त झाली. आपल्या राष्ट्राची व समाजाची नवीन आधुनिक प्रगतीवादी तत्त्वावर उभारणी केली. त्यातून नवे पर्व सुरु झाले. राज्यक्रांतीनंतर नेपोलियन बोनापार्टने अंतर्गत सुधारणा व आपल्या परराष्ट्र धोरणामुळे फ्रान्सचा विकास घडवून आणला.

### १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

संपूर्ण मानवी इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती अतिशय महत्त्वाची मानली जाते. फ्रेंच राज्यक्रातीने मध्ययुगातील हुकूमशाही नष्ट करुन, समाजाला आधुनिक लोकशाहीत आणून सोडले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन मुलभूत कल्पना फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिल्या. इ.स. १६८८ च्या इंग्लंडमधील वैभवशाली क्रांतीने राजेशाहीला मर्यादित केले. हॉब्स या विचारवंतांची विचारप्रणाली फेकून लॉकीची मर्यादित राजेशाही या विचाराचा पाठपुरावा केला. १८ व्या शतकात ज्या क्रांत्या झाल्या त्यामध्ये इ.स. १७७६ मध्ये अमेरिकन राज्यक्रांतीने वसाहवतवादला व साम्रज्यवादाला पहिला तडाखा दिला. राजाची सत्ता ही ईश्वरी सत्ता आहे. हे तत्त्व इंग्लंडच्या क्रांतीने पायधुळी तुडवले आणि घटनात्मक राजेशाहीचा प्रयोग सुरु केला. याचा परिणाम फ्रेंचवर होऊन अकार्यक्षम, दुर्बल राजसत्तेचे उच्चारटनाचा प्रयत्न केला. त्यातून फ्रेंचमध्ये इ.स. १७८९ मध्ये राज्यक्रांती झाली. तिची कारणे पुढीलप्रमाणे -

**राजकीय कारणे :**

### १) अनियंत्रित राजेशाही :

अनेक वर्षापर्यंत लोकांच्या मनात असंतोष साचला होता. त्याचा उद्रेक होऊन क्रांतीत रुपांतर झाले. याला कारण म्हणजे बुरबोन राजघराण्याची सत्ता होय. हे राजे प्रजेच्या कल्याणाची काळजी न घेता राज्यकारभार करताना 'दैवी अधिकाराचा सिद्धांत' त्यांना मान्य होता. ते लोकांच्या जीविताचे व मालमत्तेचे मालक बनून स्वतःला भाग्यविधाते समजत असे. त्यांचा शब्द म्हणजे कायदा. मन मानले तेव्हा युद्ध पुकारणे बंद करणे. १४ व्या लुईच्या काळात फ्रान्सचे युरोपच्या राजकारणात मानाचे स्थान होते. १५ व्या १६ व्या लुईच्या काळात लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला. फ्रान्सने अमेरिकेला स्वातंत्र्ययुद्धात मदत केली. त्या वेळी 'राजाविरहित राज्य' अमेरिकेत प्रस्थापित झाले. हे फ्रेंच सैन्याने पाहिले. इंग्लंडमध्ये जनतेचे सनदशीर सरकार प्रस्थापित झाले. हे फ्रेंच जनतेला समजले तेव्हा फ्रान्समधील जनतेच्या मनात राजाबद्दल असंतोष निर्माण झाला.

### २) सप्तवार्षिक युद्धात झालेली हानी :

इ.स. १७६१ मध्ये प्रशिया-ऑस्ट्रिया यांच्यात सातवर्षीय युद्ध झाले. या युद्धात फ्रान्सने ऑस्ट्रियाच्या बाजूने युद्धात उडी घेतली, परंतु फ्रान्सचा मोठ्या प्रमाणात पराभव झाला. श्रेष्ठ प्रतीचे लष्कर नष्ट झाले. प्रचंड हानी आली. त्यामुळे फ्रान्सच्या स्वाभिमानाला द्वाक्का पोहोचला, राजे लोकांच्या कर्तृत्वशून्य नेतृत्वामुळे पराभ सहन करावा लागला, याची खात्री जनतेला झाली त्यातून जागृती निर्माण होऊन क्रांती झाली.

**३) १४, १५, १६ व्या लुई:**

१४ व्या लुईची कारकीर्द दोन विभागात विभागली जाते. पहिल्या विभागात प्रचंड व्हर्सय राजवाडा व इतर अनेक इमारती बांधल्या. विद्वानाना आश्रय दिला. फ्रान्सला युरोपच्या राजकारणात मानाचे स्थान प्राप्त करुन दिले. नंतर मात्र तो स्वतःच्या इच्छेनुसार व लहरीनुसार राज्यकारभार करु लागला. मी राज्यच आहे, असे तो म्हणे, त्याने ७० वर्षे सत्ता उपभोगली. त्यांच्यानंतर १५ वा लुई इ.स. १७१५ ते इ.स. १७७४ पर्यंत सत्तेबर आला. तो चैन, विलास ऐषआरामात रंग राहिला होता. वयाने लहान असून तो अविचारी, व्यसनी, दुराचारी होता. तिजोरीचा अंदाज न घेता अमाप खर्च करत असे. 'मायानंतर प्रलय' हे त्याच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होते. १६ वा लुई इ.स. १७७४-९३ या काळात सत्तेवर आला. तो सालस व सत्प्रवृत्त त्याचबरोबर लाजाळू व एकलकोंड्या स्वभावाचा होता. राज्यारोहणा वेळी सर्व विश्व मायावर कोसळल्यासारखे मला वाटते किंवा केवढी ही प्रचंड जबाबदारी मायावर टाकण्यात आली आहे. ती पार पाडण्याचे शिक्षण मात्र मला देण्यात आले नाही." मालेशर्स या मत्र्याने राजीनामा दिला त्या वेळी तो म्हणाला, 'तू किती नशिबवान आहेस! मलाही असा राजीनामा देता आला तर, किती छान झाले असते." त्याला मंत्रिमंडळाच्या बैठकीत रस नव्हता. तो आपल्या पत्नीच्या सल्ल्याने सर्व राज्यकारभार करीत असे.

**४) राणी मेरी ॲटाईनेटचा स्वभाव :**

बुरबोन राजघराण्यात नेहमीच खियांचा वरचष्मा असत. जियाच्या तंत्राने राज्य चालत असे. १६ व्या लुईची पत्नी मेरी ॲटाईनेट ही ऑस्ट्रियाची मेरीआ येरेसा हिची कन्या होय. लहानपण कड़क बानात गेले होते. लग्नानंतर चैनीवर अफाट पैसा खर्च करुन, आरामात जीवन जगण्यास सुरुवात केली. राजकारणात तिने लुडबूड केल्याने फ्रान्स जनतेच्या मनात अप्रिय ठरली. भूकेने व्याकुळलेला मोर्चा राजवाड्यावर आला. त्या वेळी ती म्हणाली 'तुम्हाला ब्रेड मिळत नसेल तर केक खा' तिच्या या वागणुकीमुळे लोकांनी तुटीची राणी अथवा दी ऑस्ट्रियन या कुचेष्टापूर्व नावाने ओळखत असे.

**५) राजवाड्यातील उधळपट्टी :**

१४ व्या लुईने पॅरिस राजधानीपासून ११ मैलांवर व्हर्साय राजवाडा बांधला. त्यासाठी ३० कोटी रूपये खर्च केला. तेथे राजा-राणीच्या तैनातीला १५०० नोकर, खास राणीसाठी ५०० तर राजकन्येसाठी ८३ नोकर सेवेसाठी ठेवले होते. राजवाड्यात १८७५ घोडी व २१७ बाहने होती. राजाच्या पंगतीला रोज ३८२ अधिकारी जेबत असे. १०३ बाढपी करीत असे. याचा वार्षिक खर्च १० कोटी प्राँक येत असे. २ हजार उमराव राजाच्या दरबारात असे. त्यामुळे फ्रान्सचा खर्च सतत वाढत जाऊन सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात त्याचे ओझे पडू लागले.

**६) भ्रष्ट राज्यकारभार :**

फ्रान्सचे एकूण राज्यकारभारासाठी ४० विभाग केले होते. त्यावर उमरावाला गव्हर्नर म्हणून नेमले जात. ४० विभागाचे राज्यकारभारासाठी अनेक लहान भाग केले जात. त्यावर अटेंडंट हा अधिकारी नेमत. तो मध्यमवर्गीय भांडवलदार असे. हे सर्व अधिकारी भ्रष्ट, जुलमी, लाचखाऊ असल्याने प्रजेच्या कल्याणाकडे कोणाचेच लक्ष नसे, ते राजाची मर्जी सांभाळून राज्यकारभार करीत असे. त्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले,

**७) कायद्यातील गोंधळ :**

देशातील बायदा म्हणजे गोंधळाचे मूर्तिमत प्रतीक होते. कायद्याच्या बाबतीत एकवाक्यता, एकसूत्रीपणा व समता नव्हती. फ्रान्समध्ये ३६०-४०० कायदा पद्धती होत्या. मैन प्रातात १२५ प्रकारच्या कायदे पद्धती अस्तित्वात होत्या. कायदे लॅटिन भाषेत असल्याने सर्वसामान्याला समजत नसे. व्हॉल्टेअर म्हणतो की, फ्रान्समध्ये प्रवास करताना माणसाला जितक्या वेळा घोडी बदलावी लागतात, तितक्या वेळी कायद्याच्या पद्धतीसुद्धा बदलाव्या लागतात."

**८) सदोष न्यायपद्धती :**

फ्रान्समध्ये न्यायदानाची पद्धत अतिशय सदोष होती. कायदे अतिशय क्रूर आणि अन्यायकारक होते. गुन्ह्याकरिता क्रूर शिक्षा दिल्या जात. त्यांचे हातपाय तोडणे, कान कापणे, हाडे मोडतील इतका मार देणे, संशयावरून अनेक लोकांना विनाचौकशी तुरुगात डांबले जात. परंतु कायद्यात 'हेबिअस कॉपर्स' ची तरतूद नव्हती. राज न्यायालये, लष्करी, चर्च, अर्थ न्यायालये इ. विविध प्रकारचे होते, परंतु त्याचे अधिकार क्षेत्रे निश्चित नव्हते.

**सामाजिक कारणे :**

**१) फ्रान्समधील वर्ग :**

सरदार, धर्मगुरु, सर्वसामान्य लोक असे तीन वर्गात समाज विभागला होता. या प्रत्येक वर्गात वरिष्ठ व कनिष्ठ असे भेद होत. ही अन्याय व विषमतेवर आधारित होती. भूदाप्स व गुलामाचा एक वेगळाच वर्ग अस्तित्वात होता. श्रमजीवी लोकांची संख्या ९९ टक्के होती. १ टक्के लोक सरदार, अमीर-उमराव व छोटेमोठे धर्मगुरु हे होते. हे लोक बहुसंख्य जनतेवर अन्यायय-अत्याचार करीत. चैनी, बिलासी जीवन जगत असे.

**२) सरंजामदारांचे हक्क :**

सरंजामदारांचे वर्णन करताना मॉटेस्क्यू म्हणतो की, 'राजाशी बोलू शकणारा, मंत्र्याशी संपर्क साधणारा आणि ज्याला कर्ज, पेन्शन आणि वाडवडिलांचा वारसा हक्क आहे अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय.' एकूण लोकसंख्येच्या १ टक्क्याहून कमी सरजाम सरदारची संख्या होती. ६० टक्के जमीन त्याच्या ताब्यात होती. कुळाकडून जबरदस्तीने शेत पिकवली जात. विनामूल्य शेतात राबवून घेणे, चर्च व सैन्यातील मोठ्या जागा सरंजामदाराला मिळत असत. या लोकांकडे खूप संपत्ती आणि अधिकारही असत.

**३) धर्मगुरुचे हक्क :**

धर्मगुरूना समाजात प्रतिष्ठेने स्थान असून अनेक सवलती होत्या. विधी-पूजाअर्चा हे कार्य करीत असत. सरंजामदारांप्रमाणे तेही ऐषआरामात, रंगेल, चैनी जीवन जगत असत. फ्रान्समध्ये लहान-मोठे ६४०० धर्मगुरुपैकी १८ आर्चबिशप, ११७ बिशप होते. सरासरी वार्षिक उत्पन्न १ लक्ष ७५ हजार प्राँक इतके धर्मगुरुचे उत्पन्न होते. स्ट्रान्सबर्गच्या आर्चबिशपला वर्षाकाठी ३ लाख डॉलर्स इतके उत्पन्न होते. तो एका वेळी २०० लोकांना आलिशान राजवाड्यात पार्टी देऊ शकत. त्याच्याजवळ १८० घोडी होती. धर्मससथांचा वार्षिक खर्च ४६ कोटी प्रॉक होता. धर्मसंस्था भौतिक सुखविलासी आणि चैनीत असल्याने अधःपतनाला सुरुवात झाली होती. बरिष्ठ-कनिष्ठ धर्मगुरुंमध्ये संघर्ष सुरु झाला होता. धर्मगुरु कायदे व करमुक्त होते. धर्मसंस्थांना प्रजेवर धार्मिक कर बसवण्याचा अधिकार होता.

**४) सर्वसामान्य लोक अथवा श्रमजीव लोक :**

या वर्गात ९९ टक्के लोक फ्रान्समधील असून त्याच्यावर अतोनात अन्याय, अत्याचार, जुलूम होत असत. त्यांच्या ताब्यात फक्त २० टक्के जमीन होती. ९९ टक्के कराचा बोजा त्यांच्यावर होता. वरिष्ठ लोकांची सेवा करावी लागत. जमीनदार, धर्मगुरु याना नजराणे देणे, विनावेतन काम करणे, जमीनदाराच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च देणे, त्याच्या मुला-मुलींच्या लग्नाला खर्च साभाळणे स्वतः उपाशीपोटी राहून त्याची सेवा करावी लागत. कार्लाईलने त्यांचे वर्णन करताना म्हटले की, प्रजेला वर्षातील ४ महिने नियमीत निकृष्ट प्रतीचे बटाटे खाऊनच आपली गुजराण करावी लागते. आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. कामगारांना १८-२८ तास काम करावे लागे. मजुरीही अतिशय कमी प्रमाणात मिळत असे. त्यामुळे भिकायांची संख्या मोठ्या प्रमाणात बादली.

**आर्थिक कारणे**

या क्रांतीच्या मुळाशी आर्थिक कारणे होती, असे अनेक इतिहासकारांनी म्हटले आहे. दारुगोळा ठासून भरला, तो फ्रेंच तत्त्वज्ञानामुळे, परतु क्रांतीचा भटका उडाला. तो तात्कालिक आर्थिक परिस्थितीमुळे असे म्हटले जाते. १४,१५,१६ व्या लुईने स्वतःच्या महत्त्वाकाक्षेपायी अनेक युद्धात केल्याने सरकारला कर्जबाजारी आणि दिवाळखोर बनवले.

अन्यायी व विषम करपद्धती: फ्रान्समधील करपद्धती अतिशय दोषास्पद होती. संपत्तीचा साठा असणार्या अमीर, उमराव, धर्मगुरु हे करमुक्त असून, गोरगरीब जनतेवर कर लादले होते. ज्यांना १४ प्रॅंक कर भरावा लागे, त्यांना १५२ प्रॅंक्स भरावे लागत. सर्वसामान्य जनतेच्या उत्पन्नातील अर्धा हिस्सा कररूपाने द्यावा लागे. शिवाय मिठावरील कर, धर्मपट्टी, अबकारी कर, स्टॅम्टड्युटी इ. कर द्यावे लागत. प्रत्येक व्यक्तीला ७ पौड मीठ वर्षाला विकत घ्यावे लागत असे. धर्मकर बाढवण्याचा अधिकार धर्मसंस्थांना असे. उमरावाचेही कर असे. ते पुलपट्टी, पाणीपट्टी, वाहतूक कर, शेतसारा इ. वसूल आपल्या कुळाकडून करीत असे. ते पुलमही, पाणीपट्टी, वाहतूक कर, शेतसारा इ. वसूल आपल्या कुळाकडून करीत असे. प्रो. गुडपन फ्रान्समधील शेतकरी दरिद्री होते किंवा मध्यमवर्गामध्ये राजकीय असतोष होता म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांती घडून आली असे नव्हे तर फ्रान्समधील श्रीमंत वर्गाची प्रतिगामी प्रवृत्ती फ्रेंच राज्यक्रातीस कारणीभूत ठरली, तर उमराबाबर टीका करताना म्हणतो भयंकर अन्यायकारक आणि रक्तशोषणारी करपद्धती,

**धार्मिक कारणे :**

फ्रेंच जनतेच्या स्वातंत्र्याचे सर्व दृष्टीने अपहार करण्यात आलेला होता. धार्मिक स्वातंत्र्य अजिबात नव्हते. धर्मगुरुत श्रेष्ठ-कनिष्ठता ही दुफळीस व द्वेषास कारणीभूत होती. प्रोटेस्टंट धर्मावर बंदी घालण्यात आली होती. हा पंथ स्वीकारणाऱ्यास कायद्याप्रमाणे सक्तमजुरीची शिक्षा मिळत असत. शासनात व इतरत्र फक्त कॅथॉलिकांनाच नोकरी मिळत असे. ज्यू लोक व परिकयाचे हाल केले जात. व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे लोप पावले होते. कोणत्याही व्यक्तीस केव्हाही तुरुंगात टाकू शकतात. अपराधी माणसाला न्यायालयात जाऊन न्याय मागता येत नसे, कनिष्ठ धर्मगुरु धर्मविधी सांभाळत. मात्र वरिष्ठ धर्मगुरु मानाने व ऐश्वर्याने राहत असे.

**वैचारिक कारणे :**

फ्रान्समधील सरजामदार, धर्मगुरु यांच्या मक्तेदारीला तडा देण्याचे काम फ्रान्समधील विचारवंतांनी केले. त्यांनी आपल्या विचारप्रणालीतून समाजातील न्यूनगंड दूर करुन अनियंत्रित राजेशाही नष्ट करण्याची प्रेरणा दिली. त्यामध्ये फसे, मॉटेक्यू, व्हॉल्टेर, रॉबेस्पियर इ. विचारवंतांनी कार्य केले.

**१) जीओ जॅक्स रूसो (इ.स. १७१२-७८) :**

फ्रेंच लोकामध्ये क्रांतीची ज्योत पेटविण्याचे कार्य जीओ जॅकप रूसो याने केले. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी हुकूमशाही नष्ट व्हावी, त्याबरोबर संपूर्ण समाजाचा पुर्नघटना आवश्यक वाटत होती. ज्ञान, संस्कृती आणि अध्ययन यांनी मानवाचे दिवसेंदिवस अधःपतन होत गेले, असे त्याचे मत होते. मानवाच्या दःखाला समाज जबाबदार असे त्याने जाहीर केले. समाजात सर्व सुखसोयी श्रीमंत वर्गांना उपलब्ध असल्याने अशा समाजाची सर्व बंधने झुगारून द्यावे.

रूसोचे प्रमुख कार्य म्हणजे त्याने लिहिलेला 'सामाजिक करार' हा ग्रंथ होय. त्यात त्याने सांगितले की, समाजाच्या प्रारंभिक अवस्थेत लोक सहुणी होते व स्वातंत्र्य आणि समाज हक्क उपभोगीत होते. लोकांनी आपसात करार करुन राज्य अस्तित्वात आणले. त्यामुळे सरकारने लोकांच्या कल्याणाकरिता राबले पाहिजे. जर राज्यसत्ता लोकाविरोधात असेल तर ती नष्ट करण्याचा अधिकार लोकांना आहे. हे प्रथम रूसोने मांडले होते. प्रजेचे सार्वभौमत्व ही कल्पना प्रथमच मांडली. त्याच्या आधारे सरकार योग्य की अयोग्य हे ठरवणे, ही स्फूर्ती दिली.

**२) माँटेस्क्यू (इ.स. १६८९ - इ.स. १७५५) :**

फ्रेंच राजसत्तेवर टीकेचे घाव घालण्याचा प्रारंभ प्रथम मटिस्क्यूने केले. माँटेस्क्यू हा थोर राज्यशास्त्रज्ञ, प्रसिद्ध वकील व इतिहासाचा सखोल अभ्यासक होता. त्याने सर्व सामाजिक संस्थाचा व शासनपद्धतीचा अभ्यास करुन अनियंत्रित राजसत्तेवर हल्ला केला. त्याने इ.स. १७४८ मध्ये 'कायद्याचा खरा आत्मा' (Spirit of the Law) हा ग्रंथ लिहिला. १८ महिन्यात त्याच्या २२ आवृत्त्या निघाल्या, याच ग्रंथात सत्ताविभाजनाचे तत्त्व मांडले. समाजात मनुष्याला खर्या अर्थाने स्वातंत्र्य द्यायचे असेल तर सरकारने कार्यकारी, कायदेमंडळ, न्यायमंडळ या तीन शाखा परस्परापासून वेगळ्या पाहिजेत.

राज्यात कायद्याला सर्वश्रेष्ठ स्थान असावे, असे मत होते. म्हणजे घटनात्मक राज्याचा तो पुरस्कर्ता होता. त्याच्या ग्रंथाचा थोडक्यात सारांश म्हणजे इंग्लिश संसदीय राज्यपद्धती उत्तम आहे. कारण त्यात व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरेपूर संरक्षण केले होते आणि सत्ता विभाजनाच्चा सिद्धांत मांडला होता. राजा ही एक आपत्ती असून ती अनिष्ट आपत्ती आहे. राजाचे दिवस संपले आहे, असे माँटेस्क्यू म्हणत असे.

**३) व्हॉल्टेअर (१६९४ - १७७८) :**

बौद्धिक गुलामगिरी नष्ट करण्याची व व्यक्तिस्वातंत्र्याची महती पटविण्याची थोर कामगिरी व्हॉल्टेअरने केल्याने त्यास 'राजा व्हॉल्टेअर' या नावाने ओळखू लागले. तो स्वतः कवी, नाटककार, शास्त्रज्ञ, इतिहासकार व अष्टपैलू विचारवंत या नात्याने केलेले कार्य अजोड होते. उपरोध, उपहास आणि विनोट या शाखांच्या साहाय्याने त्याने प्रचलित सामाजिक संस्था, रूदी, चर्च, राजसंस्था इत्यादीवर प्रखर हल्ले चढविले. वयाच्या २३ व्या वर्षी आपल्या प्रतिभेने जगाला दिपविले आणि तो जगप्रसिद्ध झाला. वयाच्या ८४ व्या वर्षी त्याच्या सत्काराच्या वेळी टाळ्यांचा कडकडाट सुरु असतानाच हा जगप्रसिद्ध माणूस जगाच्या इतिहासात विलीन झाला. व्हॉल्टेअरने सतत व्यक्तिस्वातंत्र्याकरिता लढा देऊन अन्याय कधीही सहन केला नाही. तो हुकूमशाहीचा कट्टर विरोधक होता, परंतू लोकशाहीवरही त्याचा विश्वास नव्हता, कल्याणकारी हुकूमशाहीचा त्याने पुरस्कार केला. एका सिंहाचे राज्य परवडले, परंतु शंभर उंदरांचे राज्य नको, असे लोकशाहीबाबत मार्मिक उदार काढले. तो कॅभालिक पथाचा अभिमानी असला तरीही अधोगतीमुळे त्याने टीका केली.

**इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील घटना**

फ्रान्समध्ये बुरबॉन घराण्यातील १४, १५, १६ व्या लुईची अनियंत्रित राजेशाही होती. त्यानी समाजावर दुःखाचा डोंगर लादला. त्याच्या अन्यायातून क्रांतीचा उदेग होऊन, जुनी राज्यव्यवस्था व सरंजामशाही इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने रसातलाला पोहचवली. या क्रांतीच्या घडामोडी पुढीलप्रमाणे घडल्या. इ.स. १७८९ पासून राज्यक्रांतीला प्रारंभ झाला तो इ.स. १७९५ मध्ये तिचा शेवट होऊन, प्रजासत्ताकाची घटना तयार केली. राज्यक्रांतीच्या घटनांचे दोन विभागात वर्गीकरण केले जाते. १) इ.स. १७८९-९१.२) इ.स. १७९१-९५.

**१) फ्रान्समधील आर्थिक दिवाळखोरी :**

१४ व्या, १५ व्या लुईने विनाकारण पैशांची उधळपट्टी केली, गोरगरीबाबर कर लादून आर्थिक परिस्थिती साबरण्यास प्रयत्न केला. पण ते अशक्य झाले. राष्ट्रीय कर्जाची रक्कम ४,४६,७४,७८,००० लिरा एवढे बाढले. या दिवाळखोरीतून फ्रान्सला वाचवण्यासाठी १६ व्या लुईने तुर्गा इ.स. १७७४-७६ नंतर नेकर इ.स. १७७६-८१ असे अर्थमंत्री नेमले. यांनी अर्थव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. सरजामदार व धर्मगुरुच्या हक्कावर मर्यादा येऊ लागल्याने त्यांनी विरोध केला, नंतर कॅलोन हा नवा अर्थमंत्री नेमला. त्याने वरिष्ठांची मर्जी साभाळण्यासाठी वरिष्ठ वर्गाला पसंत पडेल तेच धोरण राबविण्याचे ठरवले. त्यानुसार त्याने नवीन कर्ज काढून व कर बसवून अर्थखाते सावरण्याचा प्रयत्न चालवला. पण मॅरिसच्या पार्लमेंटने या गोष्टीस विरोध केला व कर बसवण्याचा व कर वाढविण्यास अधिकार फक्त

लोकप्रतिनिष्ठी मंडळास म्हणजेच इस्टेट जनरलला आहे असे जाहीर केले. लुईने त्यास विरोध केला. पण अखेर १७५ वर्षे न बोलवलेले पार्लमेंट त्याने इ.स. १७८९ जानेवारीमध्ये निवडणुका घेऊन ५ मे १७८९ रोजी इस्टेट जनरलचे व्हर्साय राजवाड्यात पहिले अधिवेशन भरेल असे सागितले.

### २) इस्टेट जनरल (लोकसभेची बैठक बोलावली) ५ मे १७८९:

फ्रान्समधील दिवाळखोरीला वाचवण्यासाठी व पैसा मिळविण्यासाठी १६ व्या लुईने जानेवारी १७८९ मध्ये निवडणुका घेतल्या आणि नवीन लोकसभा तयार केली. त्याचे ५ मे १७८९ रोजी पहिले अधिवेशन व्हर्यायच्या राजवाड्यात भरवले. लोकसभेला विश्वासात घेऊन नवीन कर्ज व नवीन कर प्रजेवर लादता येतील या अपेक्षेने राजाने ही बैठक बोलावली.

लोकसभेत उमराव सभा, धर्मगुरु सभा, सामान्य लोकाचे पतिनिधित्व करणारी सभा असे तीन वर्ग होते. सामान्याच्या सभागृहाने कोणताही ठराव माडल्यास उमराब व धर्मगुरु सभा आपल्या बहुमताच्या जोरावर ठराव फेटाळून लावीत असत. त्यामुळे सामान्य जनतेला न्याय मिळत नसे. या लोकसभेत ६२१ सामान्यांचे प्रतिनिधी, २८५ उमरावांचे, ३०८ धर्मगुरुचे सभासद असे १२१४ एकूण प्रतिनिधी या बैठकीला हजर होते.

### ३) राष्ट्रीय सभेची स्थापना १७ जून १७८९ :

६ मे १७८९ ला बैठकीच्या कामकाजाला सुरुवात झाली. लोकसभेच्या बैठकी नियमित भरवाव्यात, कायदे करण्याचा, करआकारणी मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार असावा व समाजातील सर्व वर्गाबर समान कराची आकारणी व्हावी इ. मागण्या अधिवेशनात होत्या. आतापर्यंत उमराव व धर्मगुरु यांचे वेगळे तर थर्ड इस्टेटचे वेगळे अधिवेशन भरत. पण या वेळी तीन सभागृहाची संयुक्त बैठक व्हावी ते संयुक्त गृह असावे, अशी मागणी थर्ड इस्टेटने केली, परंतु त्यांना यश मिळाले नाही म्हणून ॲबेसिएस या क्रांतिकारकाने सर्वसामान्याचे प्रतिनिधी मंडळ हेच राष्ट्रीय मंडळ होय असे जाहीर करुन १७ जून १७८९ रोजी राष्ट्रीय सभा म्हणून जाहीर केली.

### ४) टेनिस कोर्टावरील शपथ २० जून १७८९ :

राष्ट्रीय सभेचे सभासद बैठकीकरता २० जून १७८९ रोजी सभागृहात गेले. त्या वेळी राजाने प्रवेश करण्यास नकार दिला. त्यामुळे हे सभासद राजवाड्याजवळील टेनिस कीडांगणावर जमले. राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष बेलच्या नेतृत्वाखाली आव्हान केले की, 'लोकांचे सार्वभौमत्व सिद्ध करणारी घटना तयार होईपर्यंत आपली एकजूट कायम ठेवावयाची' अशी शपथ येथे घेतली. ही शपथ 'टेनिस कोर्टावरील शपथ' म्हणून प्रसिद्ध आहे. जुलमी राजवटीस मूठमाती व घटनात्मक राजवटीची स्थापना या दोन गोष्टींची ही शपथ म्हणजे क्रांतीची निदर्शक होय.

### ५) राष्ट्रीय सभेचे घटना समितीत रूपांतर २७ जून १७८९ :

सत्तापिपासू आणि पिळवणूक करणार्या वरिष्ठ वर्गाने राजावर दडपण आणूनसामान्य जनतेला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. २३ जूनला राजाने तिन्ही वर्गाचे मिळून एकत्र अशी इस्टेट जनरलची बैठक बोलावली, पपतु राजाने वरिष्ठ व कनिष्ठ वर्गाचे प्रतिनिधी वेगवेगळ्या सभागृहात बसतील असे जाहीर केले. भर्ड इस्टेटचे प्रतिनिधी सभागृहात बसून राहिले. त्यावेळी राजाचा अधिकारी डी बीज हा आला आणि सागितले की, 'राजाने हा सभागृह सोडून जाण्यास सांगितले.' पण मिरोबाच्या नेतृत्वाखाली थर्ड इस्टेटने निर्णय घेलला आणि डी बीजला सागितले, 'तुपया राजाला जाऊन साग की प्रजेच्या इच्छेनुसार आम्ही या सभागृहात जमा झालो आहेत. आम्ही येथून हलण्यास तयार नाही व लोकप्रतिनिधीवर जे हात उगारतील ते महान देशद्रोही ठरतील,' असा ठराव पास केला. शेवटी १६ वा लुई हताश होऊन तिन्ही वर्गाचे प्रतिनिधी एकत्र बसण्याचा हुकूम फर्मावला २७ जून १७८९ रोजी लोकांच्या विजय होऊन पुढे राष्ट्रीय सभेला घटना समितीत रूपालर केले.

### ६) बॅस्टिलचा पाडाव १४ जुलै १७८९:

राजा व थर्ड इस्टेट यांच्या संघर्षात राजाचा पराभव झाला. घटना समितीने कारभार चालवणे ही जनतेला लुडबूड बाटू लागली. ग्रामीण व शहरी लोक उपासमारीने मरू लागले तेव्हा लोकांचा ओढा शहराकडे वाढू लागला. फ्रान्स शहरात नागरिकात संताप ब तिरस्कार वाढत होता. या खवळलेल्या जनसागराचे नेतृत्व मॅरट, रोबेस्पिअर, कॅमिली डेरमोलिन्स इ. पुढार्यांनी केले. त्यांनी हॉटेल-दी-व्हिला हे दारूगोळ्याचे कोठार ताब्यात घेतले. त्यानी किल्ले, तुरुग, अमिराच वाडे याबर हल्ले केले. त्यामुळे राजाने ११ जुलैला नेकर व इतर अधिकार पदाबरुन दूर केले. संन्यात नागरी सुरक्षा दल व पुढे राष्ट्रीय सुरक्षा दल निर्माण करण्यात आले. याचा सेनापती लाफायते होय. या राष्ट्रीय सभेच्या सैन्याने अनियंत्रित जुलमी राजसत्तेचे प्रतीक असलेल्या बॅस्टिलच्या किल्ल्यावर हल्ला चढवला. तेथे पाच तास लढाई झाली. त्यामध्ये डी लुने हा राज्यपाल ठार झाला. १४ जुलैला विजय मिळाला, तो दिवस 'राष्ट्रीय दिवस' म्हणून जाहीर केला. या वेळी ब्युरबॉन घराण्याचा जुन्या झड्याऐवजी लोकांनी लाल, पांढरा, निळा या तिरंगी ध्वज राष्ट्रीय ध्वज फडकवला. बॅस्टिलच्या पाडावाची बातमी १६ व्या लुईला सांगितली. तो म्हणाला, हे फार मोठे बड आहे. तेव्हा जिलायन कोर्ट याने १६ व्या लुईला सांगितले की, नाही महाराज, ही फार मोठी क्रांती आहे. या संदर्भात प्रो. गुडवीन, 'फ्रेंच राज्यक्रांतीत या एकाच घटनेमुळे दूरगामी आणि सर्वगामी परिणाम घडून आलेत. दुसर्या कोणत्याही घटनेशी या घटनेची तुलनाच करता येत नाही.

### ७) ४ ऑगस्टची सामाजिक क्रांती :

बॅस्टिलच्या पाडावानतर ही चळवळ सर्व फ्रान्सभर पसरली. वरिष्ठ वर्गाच्या अत्याचाराविरुद्ध फ्रेंच जनता सूडाने पेटली होती. उमराव, धर्मगुरु यांच्या घरावर हल्ले करून लूट व उद्ध्वस्त करत होते. धान्याचे साठे, करारपत्रे जाळून टाकली. त्यामुळे वरिष्ठ वर्गाचे हाल होऊ लागले. ४ ऑगस्टला राष्ट्रीय सभेची बैठक सुरु असतानाच व्हायकाऊट ऑफ नॉआलिसने जाहीर केले की, 'उमरावाच्या सर्व अधिकाराचा त्याग करत आहोत. राष्ट्रीय सभेने सरजामशाहीचा शेवट करावा.' त्यामुळे उमराव, धर्मगुरु यांनी आपले सर्व अधिकार सोडून दिले. यावेळी राष्ट्रीय सभेने ३० ठराव पास केले. त्यानाच ४ ऑगस्टचे बटहुकूम असे म्हणतात. त्यानुसारच, ढिगारीची पद्धत, उमराबाचे कर, चर्च, धर्मगुरुचा कर रद्द करावेत. नोकरीत प्रवेश देताना उच्चनीच भेदभाव करु नये. न्यायदान निःपक्षपातीपणे करावे. सर्वांना समान लेखण्यात येईल. सामाजिक विषमता नष्ट करावी. इ. कायदे मंजूर केले. अशा रीतीने एका रात्रीतून फ्रान्समध्ये सामाजिक क्रांती घडली. अन्यायाला व जुलमाला कायमची मूठमाती देऊन ४ ऑगस्ट हा दिवस फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासात अमर झाला. राष्ट्रीय सभेने राजाला फ्रेंच स्वातंत्र्याचा संस्थापक म्हणून जाहीर केले.

### ८) व्हर्साय राजवाड्यावर खियांचा मोर्चा (५ ऑक्टोबर १७८९) :

४ ऑगस्टची सामाजिक क्रांती झाल्यानंतर अनेक सरदार, धर्मगुरु यांनी हक्कांचा त्याग करण्यास विरोध केला, १६ व्या लुईचा भाऊ काऊट ऑफ अर्टीअस माने फ्रान्समधून पळ काढून परकीय संन्याच्या मदतीने कांती चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. १६ व्या लुइने कान फुंकले. त्यामुळे त्याने सामाजिक क्रांतीच्या करारावर सही करण्यास विरोध दर्शवला. त्यामुळे फ्रेंच जनतेत मोठा असंतोष निर्माण झाला. या वेळी दुष्काळाने भेसूर थैमान घातले हाते. स्त्रियांनी एक मूक मोर्चा राजवाड्याकडे नेला. या मोर्चात दीड हजार जिया असून लफायतेचे नॅशनल गार्ड सोडत होते. 'भाकरी! भाकरी' घोषणा देत राजवाड्याजवळ आले. या मोर्चाने पहारेकर्यांना ठार मारुन राजवाड्यात प्रवेश केला. राज कुटुबातील व्यक्ती कैद केल्यानंतर हा मोर्चा पॅरिस शहराकडे गेला.

### ९) राजाचा पॅरिसमधून पलायनाचा प्रयत्न (२० जून १७९२) :

मूक मोर्चाने राजा-राणी यांना ट्युलरीस राजबाड्यात नजरकैदेत ठेवले. धर्म संस्थेविषयक नवी घटना मान्य नव्हती. तेव्हा ऑस्ट्रियाची मदत घेऊन ही क्रांती चिरडून टाकावी, असा विचार केला. यासाठी २० जन रोजी बेषातर करून पळून

जाताना वरेन्स या खेड्यात पकडले. राजाची धिंड काढून पुन्हा पॅरिसमध्ये कैदेत ठेवले. पुढे फ्रान्सच्या कारभारात गोंधळ निर्माण झाला. इ.स. १७९१ रोजी राष्ट्रीय सभा बरखास्त झाली.

**इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम**

फ्रान्समधील अनियंत्रित राजेशाहीचा व सरजामशाहीला फ्रेंच जनता बिटली होती. त्यांच्या जुलमाला प्रत्युत्तर देण्यासाठी सर्वसामान्य जनतेने १७८९ मध्ये कांती केली, या क्रांतीला हिंसात्मक वळण लागल्याने फ्रान्सचे जगातील बरेच देश शत्रू बनले. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी फ्रान्समध्ये दहशतवादाची राजवट निर्माण झाल्याने अनेक पुढाऱ्याऱ्यांना फासावर जावे लागले. १६ व्या लुईला फाशी देऊन जनतेने पट्टिले प्रजासत्ताक राज्य स्थापन केले, परतु मध्यमवर्गाने आपल्या हक्कासाठी पुन्हा चळवळीला प्रारंभ केला. त्यामुळे जेकोब्बियन्स विचारसरणीकडे बरेच झुकू लागले. जरी फ्रान्समध्ये लोकशाही प्रस्थापित केली तरी जास्त काळ टिकू शकली नाही. राष्ट्रीय सभेने व नॅशनल कन्व्हेशन यानी फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात कार्य केले आणि फ्रान्सची क्रांती घडवण्यास साथ दिली. या फ्रान्सच्या क्रातीमुळे फ्रान्स व जगाबर वेगळेच परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे -

**१) अनियंत्रित राजेशाहीचा शेवट :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे जुन्या अनियंत्रित हुकुमशाही राजवटीला कायमची मूठमातीमिळाली. 'राजा म्हणजे ईश्वराचा प्रतिनिधी आणि तो आपल्या लहरीनुसार राज्य करू शकतो, या कल्पना कायमच्या गाडल्या गेल्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही तत्वे पुरस्कृत करणारा राजा फक्त राज्य करु शकेल ही कल्पना लोकाच्या मनात कायमची रुजली, १६ व्या लुईला फरसाबर लटकून प्रसासत्ताक स्थापन केले. नेपोलियन बोनाफार्ट, १४ बा लुई, लुई फिलीप, नेपोलियन तिसरा यानी जरी अनियंत्रित राज्यकारभार केला तर पूर्वीच्या राज्यकर्त्यापेक्षा राजबट वेगळी होती. या अनियंत्रित सत्तेचा शेवट होऊन १८७० मध्ये फ्रान्समध्ये प्रजासत्ताक शासनपध्दती सुरु झाले.

**२) सरजामशाहीला कायमची मूठमाती:**

फ्रेंच राज्यक्रातीमुळे उमरावशाही, सरंजामशाही यांचा कायमचा शेवट केला. धर्मगुरुच्या सवलती रद्द केल्या, चर्चची संपत्ती जप्त केली. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. सर्वांना समान न्या, कराची आकारणी समान केली. पिढीजात पदे रद्द केली.

**३) जनमताचे श्रेष्ठत्व मान्य झाले :**

फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळे रूसोची 'लोकांचे सार्वभौमत्व' ही कल्पना कायमची रूढ झाली. राजा लोकाचा प्रतिनिधी आहे तो जर लोकांचे हित साधत नसेल तर त्याला काढून टाकता येते म्हणजे लोकाचा हक्क सर्वमान्य झाला. फ्रेंच राज्यक्रातीने लोकशाहीचा पाया घातला गेला.

**४) राष्ट्रीयत्वाचा कल्पनेचा उदय :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपात एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला जोरदार चालना मिळाली. एकजुटीशिवाय तरणोपाय नाही, याची खात्री युरोपला पटली. अतर्गत प्रश्नांची सोडवणूक सुद्धा एकजुटीवर आहे. इटाली, जर्मनी, तुर्काच्या अंमलाखालील बाल्कन राष्ट्रे यांनी एकीकरणाची चळवळ सुरु केली. एकजुटीमुळे जर्मनी, इटाली, बलिष्ट राष्ट्रे उदयास आली.

**५) स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या कल्पनाचा सर्व मुरोपात प्रसार :**

स्वातत्र्य, समता, बंधुत्व ही तत्त्वे फ्रान्सपुरती मर्यादित न राहता संपूर्ण युरोपने स्फूर्ती व प्रेरणा घेतली. आपल्या देशात लोक नियंत्रित सरकार असावे, असे अनेक देशाना बाटू लागले. याचा परिणाम १९ व्या शतकाच्या अखेरीस

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मजूर प्रतिनिधी निवडून आले. जर्मनी, ऑस्ट्रियाल लोकशाही शासन प्रस्थापित झाले. इटालीत सासदीय लोकशाही रूढ झाली. रशियात चळवळ होऊन ड्युमा नावाचे एक राष्ट्रीय मंडळ स्थापन झाले. तुर्कस्थानातही अनेक चळवळी होऊन शेवट इ.स. १९०८ मध्ये संसदीय सरकार प्रस्थापित झाले. फ्रान्समध्येट्टी नेपोलियनच्या पाडावानंतर इ.स १८७१ मध्ये तिसरे गणराज्य प्रस्थापित झाले.

### ६) खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होण्यास प्रारंभ :

फ्रान्सच्या कांतीने समतेच्या तत्त्वाचा जोरदार पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान असावी. प्रत्येकाला न्याय मिळावा ही तत्त्वेचे होती. संपत्तीवर अगर जन्माबर त्या व्यक्तीला श्रेष्ठत्व देणे अगर समाजाला अधिकार देणे मान्य नाही. हे जगासमोर फ्रेंच राज्यक्रांतीने सिद्ध केले. त्याचा परिणाम बरिष्ठ वर्गाचे विशेष द्दक्क नष्ट केले. धार्मिक क्षेत्रात सहिष्णुतेचा पुरस्कार केला. वृत्तपत्राना स्वातंत्र्य बहाल केले. प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क दिला. अशा रीतीने क्रांतीचा परिणाम होऊन समतेला सुरुवात झाली.

### ७) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे मानवतावादी कार्याला उत्तेजन दिले:

फ्रान्सच्या कांतीपासून स्फूर्ती घेऊन अनेकांनी मानवतावादी कार्ये आरभिली. निरनिराळ्या देशात गुलामांची पद्धत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तुरुंगात खितपत पडलेल्या कैद्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करण्यात आला. आरोग्यदृष्ट्या तुरुगाच्या इमारती नीट बाधल्या जात. अशा रीतीने मानवतावादी कार्याकडे लक्ष वेधले गेले.

### ८) सौंदर्यवादी वाड्याची निर्मिती :

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, रूढीविरुद्ध बंड आणि पवित्र भावनावर व्यक्तीच्या जीवनाची उभारणी करणे यावर विशेष भर देण्यात आलेला होता. आता सौद्यबादी वाक्याची निर्मिती होऊ लागली. व्हिक्टर ह्यूगो याचे 'ला मिझरएबल' साऊथीचे 'जोन ऑफ आर्क' गटे फॉस्ट इ. अनेक सुंदर वाडमीन कलाकृतीत याच काळात निर्माण झाल्या.

### ९) रोमन कॅथॉलिक चर्चबाबत सहानभूती :

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये व नेपोलियनच्या राजवटीत कॅथॉलिक धर्मियांना अपमानस्पद वागविणे व कॅथॉलिक लोकांना, धर्मगुरु, पोप यांना सतत मानहानी सहन करावी लागली. ती त्यांनी शांतपणाने सहन केली. त्यामुळे कॅथॉलिक धर्मियाबाबत युरोपात हळूहळू सहानुभूती निर्माण झाली. हा क्रांतीचा परिणाम समजला जातो.

### १०) मालमत्ता बाळगण्याच्या हक्काबाबत आदर उरला नाही:

फ्रान्स राज्यक्रांतीने उमराव-सरदाराच्या मालमत्तेवर उघड हल्ले चढविले जे फ्रान्समधून पळून गेले. त्यांची मालमत्ता जप्त केली. त्यामुळे मालमत्ता बाळगण्याच्या व्यक्तिगत हक्काला विशेष पावित्र्य राहिले नाही. त्यामुळे ती समाजवादाच्या दिशेने प्रगती समजली जाते. राज्यातील सर्व मालमत्ता ही राज्याच्या म्हणजे लोकाच्या मालकीची आहे, ही कल्पना पक्की रूजली.

### ११) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्सला सुबत्ता प्राप्त झाली :

क्रांतीपूर्वी फ्रान्स हा दुष्काळग्रस्त आणि नाविकी प्रदेश होता. क्रातीनतर हजारो गरीबांना माफक किंमतीत जमिनी मिळाल्या. त्यांनी त्या जमिनी लागवडीखाली आणल्या. परिणामी १७९४ पर्यंत फ्रान्स धनधान्यानी समृद्ध बनला. त्यामुळे प्रजासत्ताकाच्या व नेपोलियन काळात अनेक युद्धाला तोड देऊन विजय प्राप्त केला.

**१२) फ्रेंच राज्यक्रांतीमुळे एकराष्ट्राची कल्पना वाढीस लागली :**

फ्रेंच राज्यक्रातीमुळे राष्ट्रभावना वाढीस लागली. आतापर्यंत राजाबाबत प्रेम म्हणजे देशभक्ती अशा कल्पना रुढ होत्या. आता राष्ट्र ही कल्पना समोर येऊन राष्ट्रप्रेम जागृत झाले. राष्ट्रासाठी त्याग करणे ही कल्पना रुजविली गेली. फ्रेंच राज्यक्रांतीचे राष्ट्रप्रेम ही मोठी देणगीच समजली पाहिजे.

**१३) भूदास पद्धत व वेठबिगारी नष्ट :**

फ्रेंच क्रांतीने फ्रान्समधील उमराबांच्या ताब्यातील भूदासांना स्वतंत्र केले. वेठबिगारी व गुलामगिरी बंद केली. सामाजिकता विषमतेचा पायाच उखडला जाऊन समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व या क्रांतीच्या तत्त्वावर आधारित नवसमाज निर्माण झाला.

**१४) शासकीय सुधारणा :**

समानतेचे तत्त्व हा शासकीय कारभाराचा पाया बनून फ्रान्सच्या शासनव्यवस्थेत क्रांतिकारी बदल झाला. कायदे पद्धतीतील लहरीपणा संपून एकसूत्रता आली. सर्व फ्रान्सला एक कायदेव्यवस्था, एक न्यायव्यवस्था लागू करण्यात आली. त्यामुळे सर्वसामान्य वर्गाची पिळवणूक थांबली. आर्थिक क्षेत्रात कर देणार्याच्या पात्रतेचा विचार करणारी पुरोगामी करपद्धती सुरु झाली. कर्तबगारीचा विचार होऊन नोकर्या अधिकारपदे मिळू लागली.

अशा रीतीने फ्रेंच राज्यक्रातीचे परिणाम पाहता फ्रेंच राज्यक्राती अतिशय महत्त्वाची ठरते. युरोपातील हुकूमशाही, जुलमी राजसंस्था, विषमता, पिळवणूक एका बाजूला आणि दुसर्या बाजूला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि युरोपाची ठिकठिकाणी प्रस्थापित लोकशाही सरकारे यांच्या म्हणजे जुन्या नव्याच्या सीमारेषेवर फ्रेंच राज्यक्राती उभी आहे. म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांतीने युरोपचा इतिहासाला नवीन वळण लावले आणि युरोपात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या नवीन कल्पनांचा उद्घोष केला असे म्हणण्यात येते. जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने फ्रेंच राज्यक्रांती ही महान घटना समजली पाहिजे.